१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड मंगळवार । दि. १४ जुलै २०२६ । अंक ३८ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## गोहत्या बंदीच्या आदेशाला स्थगिती

**नवी दिल्ली :** तामिळनाडूमध्ये बकरीद किंवा इतर कोणत्याही दिवशी गायी व वासरांच्या कत्तलीवर बंदी घालण्याचे निर्देश देणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्थगिती दिली. या आदेशात सुधारणा आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने तामिळनाडू सरकारच्या याचिकेवर नोटीस बजावली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावरील अंतिम सुनावणी होईपर्यंत उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे.

## तेहरानमध्ये रशियाच्या विमानाने तणाव

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर रशियाने आपले अत्यंत सुरक्षित टीयू-२१४ पीयू हवाई कमांड विमान इराणची राजधानी तेहरान येथे पाठवल्याची माहिती समोर आली आहे. हे विमान सुरक्षित दळणवळण, कमांड आणि नियंत्रण प्रणालीने सुसज्ज असून, संकटकाळात देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाला लष्करी व सरकारी कारवायांचे नियंत्रण ठेवण्यासाठी वापरले जाते. त्यामुळे याला रशियाचे डूम्सडे प्लेन (प्रलयकालीन विमान) असेही म्हटले जाते. दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

वे|ध|क

## विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू

**पाली/बेणसे :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून, रामवाडी येथील २१ वर्षीय तरुणाचा विहिरीत बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. विघ्नेश सुरेश तेलंगे (२१, रा. रामनगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. सुधागड तालुक्यातील रासळ ग्रामपंचायत हद्दीतील रामवाडी येथे ही दुर्दैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, विघ्नेश तेलंगे हा आपल्या चार मित्रांसोबत परिसरातील एका विहिरीजवळ गेला होता. विहिरीतील खोल पाण्यामुळे तो बुडाला असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील पान ५ वर

## राफ्टिंगदरम्यान तरुणाचा बुडून मृत्यू

**धाटाव :** रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीत राफ्टिंग करताना मुंबईतील २६ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (दि. ११) घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, कुंडलिका नदीतील राफ्टिंगच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई येथील मनोज अमरनाथ (२६) हा तरुण मित्रांसह कुंडलिका नदीत राफ्टिंगसाठी आला होता. राफ्टिंगदरम्यान तो बुडाला. त्याचा शोध घेण्यात आला असता त्याचा मृतदेह मिळून आला. या घटनेमुळे त्याच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रोहा तालुक्यातील साजे, येरळ, धगडवाडी, आंबिवली आणि कामत परिसरातून वाहणाऱ्या कुंडलिका नदीत पंधरा वर्षांपासून राफ्टिंगचा व्यवसाय सुरू आहे.

# लाडकी बहीण अपात्र ?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ ही महायुती सरकारची सर्वाधिक चर्चेतील योजना ठरली होती. या योजनेच्या माध्यमातून लाखो महिलांना आर्थिक मदतीचे आश्वासन देत जनतेचा कौल मिळवल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात असतानाच, आता ई-केवायसी, उत्पन्न मर्यादा, वाहन मालकीसह विविध निकषांमुळे पात्र लाभार्थी महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याने राज्यात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या योजनेतील ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चासंदर्भात कॅगनं मारलेले ताशेरे आणि ९२ लाख लाभार्थी वगळल्याच्या चर्चेने खळबळ उडाली आहे. दरम्यान, निवडणुकीत आश्वासनांची खैरात आणि सत्तेत आल्यानंतर अटी-शर्तींचा पाऊस पाडत सरकारला लाडकी बहीण नकोशी झाली असून, विविध अटी-शर्तींच्या जंजाळात अडकून लाडकी बहिणीला ‘अपात्र’ करण्याचा डाव आखण्यात येत असल्याची टीका विरोधकांकडून करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सुरुवातीला २ कोटी ६३ लाख महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी सुरुवातीच्या टप्प्यात सुमारे २ कोटी ४३ ते पान ५ वर

### विविध निकषांमुळे लाभार्थी संख्या १.६७ कोटींवर




### रायगडची आकडेवारीच उपलब्ध नाही

राज्यातील लाडकी बहीण योजनेतील पात्र व अपात्र लाभार्थ्यांची आकडेवारी जाहीर होत असताना, रायगड जिल्ह्यातील लाभार्थ्यांची माहिती मात्र उशिरपर्यंत मिळू शकली नाही. यासंदर्भात महिला व बालविकास विभागाकडे माहिती विचारणा केली असता, संबंधित विभागाचे अधिकारी श्री. कुलकर्णी यांनी ‘‘आज माहिती उपलब्ध नाही, उद्या देतो,’’ असे उत्तर दिले. त्यामुळे रायगडमधील पात्र, अपात्र आणि लाभार्थी महिलांची नेमकी संख्या समजू शकली नाही.

> ऑगस्ट २०२५ पासून ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती आणि त्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली होती. त्यानंतरही एप्रिलपर्यंत त्रुटी दुरुस्त करण्याची संधी देण्यात आली. त्यांच्या माहितीनुसार, सुमारे ६० लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केलेली नाही. तसेच आयकर विभागाच्या माहितीनुसार, सुमारे ५ लाख, तर कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त असल्यामुळे १४ ते १५ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. वाहन मालकीच्या निकषामुळेही सुमारे ४.५ ते ५ लाख महिलांची नावे अपात्र ठरल्या आहेत.
>
> – आदिती तटकरे, महिला व बालविकास मंत्री

### लाडकी बहीण योजनेची आकडेवारी

| | |
|---|---|
| एकूण नोंदणी | २ कोटी ६३ लाख |
| सुरुवातीला पात्र लाभार्थी | २ कोटी ४३ ते २ कोटी ४७ लाख |
| ई-केवायसीनंतर पात्र लाभार्थी | १ कोटी ६७ लाख |
| शेवटच्या हप्त्याचा लाभ मिळालेल्या महिला (डीबीटी) | १ कोटी ६७ लाख |
| ई-केवायसी न केलेल्या महिला | ६० लाख |
| आयकर निकषामुळे अपात्र | सुमारे ५ लाख |
| उत्पन्न मर्यादा (अडीच लाखांपेक्षा अधिक) | १४ ते १५ लाख |
| वाहन मालकीमुळे अपात्र | ४.५ ते ५ लाख |

# सुनेत्रा पवारांना राष्ट्रवादीतूनच विरोध ?

### अध्यक्षपदाच्या निवडीला आव्हान देत कायदेशीर नोटीस

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दिवंगत नेते अजित पवार यांच्या पश्चात राष्ट्रवादी काँग्रेसची धुरा सांभाळणाऱ्या उपमुख्यमंत्री आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाला पक्षातूनच मोठा सुरुंग लावण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी थेट वकिलामार्फत कायदेशीर नोटीस पाठवून सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीलाच आव्हान दिले आहे. या अत्यंत अनपेक्षित कायदेशीर पवित्र्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

सच्चिदानंद सिंह यांनी ९ जुलै रोजी ही कायदेशीर नोटीस बजावली आहे. यामध्ये त्यांनी पक्षांतर्गत लोकशाहीचा दाखला देत राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक पुन्हा घेण्याची मागणी केली आहे. ही नोटीस सुनेत्रा पवार (पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून), प्रफुल्ल पटेल (कार्यकारी अध्यक्ष म्हणून), ब्रिजमोहन श्रीवास्तव (पक्षाचे राष्ट्रीय सचिव म्हणून) यांना पाठवण्यात आली आहे.

नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार, २६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेली राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक पूर्णपणे अवैध आणि बेकायदेशीर आहे. त्यामुळे ही निवड तात्काळ रद्द करण्यात यावी. तसेच, एका स्वतंत्र आणि निष्पक्षपाती निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती करून नव्याने निवडणूक प्रक्रिया राबवली जावी. तोपर्यंत राष्ट्रीय अध्यक्ष आणि सुधारित ऑफिस बेअररची यादी अवैध समजण्यात यावी, असे या नोटीसमध्ये म्हटले आहे.

गत जानेवारी महिन्यात उपमुख्यमंत्री पान ५ वर

# महसूल शिबिरात भाजपाचा ‘सोलो शो’




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महायुती सरकारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियानच्या रायगड जिल्ह्यातील पूर्वतयारी बैठकीने राजकीय चर्चांना तोंड फोडले आहे. कारण, महायुतीच्या नावाने आयोजित बैठकीत मंचापासून सभागृहापर्यंत भाजपचाच बोलबाला दिसून आला; तर शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या प्रमुख प्रतिनिधींची अनुपस्थिती अनेक प्रश्न उपस्थित करून गेली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी भाजपचे आमदार प्रमोद जठार होते. अभियानाची माहिती देतानाही आघाडी त्यांनीच घेतली. मंचावर जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उत्तर रायगड भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांच्यासह भाजपचेच पदाधिकारी दिसत होते. महायुतीतील इतर घटक पक्षांचे प्रमुख प्रतिनिधी मात्र दिसले नाहीत. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील पत्रकार परिषद ही महायुती सरकारची पान ५ वर

### शासकीय उपक्रमावर भाजपची छाप ?

महसूल विभागाच्या या शासकीय अभियानाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत प्रशासनासोबत प्रामुख्याने भाजपचेच लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी उपस्थित असल्याचे चित्र दिसले. त्यामुळे हा महायुती सरकारचा संयुक्त उपक्रम होता की भाजपचा राजकीय कार्यक्रम, अशी चर्चा जिल्ह्यात रंगू लागली.

# घरोघरी पडताळणी कागदावरच ?

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

निवडणूक आयोगाने मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्यासाठी मोठ्या अपेक्षेने सुरू केलेली विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन (एसआयआर) मोहीम रेवदंडा परिसरात उद्देशापासून भरकटल्याचे चित्र समोर येत आहे. घराघरांत जाऊन मतदार पडताळणी करण्याऐवजी अनेक ठिकाणी बूथ लेव्हल ऑफिसर (बी.एल.ओ.) शाळा किंवा ठराविक केंद्रांवर बसूनच कागदपत्रे स्वीकारत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे मतदारांनी प्रशासनाकडे जायचे की प्रशासनाने मतदारांच्या दारात पोहोचायचे? असा संतप्त सवाल उपस्थित होत असून, मोहिमेच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



एस.आय.आर. मोहिमेचा मूळ उद्देश प्रत्येक मतदाराच्या घरापर्यंत पोहोचून मतदार यादीची पडताळणी करणे, नवीन मतदारांची नोंदणी करणे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे, आवश्यक कागदपत्रांची माहिती देणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे हा आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक नागरिकांना बी.एल.ओ. घरपोच आलेच नसल्याचा दावा केला जात आहे.

रेवदंडा परिसरातील अनेक वाड्या-वस्त्यांमध्ये आजही नागरिकांना एस.आय.आर. मोहिमेची पुरेशी माहिती मिळालेली नाही. कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, अर्ज कोठे भरायचा, पडताळणीची प्रक्रिया काय आहे, अंतिम मुदत कोणती, अपूर्ण कागदपत्रांचा परिणाम काय होईल,

### बीएलओ शाळेतच; मोहिमेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह

याबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम आहे. प्रभावी जनजागृतीचा अभाव असल्याने अनेक पात्र मतदार प्रक्रियेपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, एकटे राहणारे वृद्ध, दिवसभर कामानिमित्त बाहेर असणारे कामगार, महिला तसेच दुर्गम भागातील मतदारांपर्यंत ही मोहीम पोहोचत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रशासनाच्या कार्यालयात जाणे शक्य नसलेल्या नागरिकांचे काय, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

नागरिकांच्या मते, जर मतदारांनीच शाळा किंवा केंद्रावर जाऊन कागदपत्रे पान ५ वर

## आज पुरवणी परीक्षेचा निकाल

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी व बारावीच्या जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेचा निकाल मंगळवार, दि. १४ जुलै रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर निकाल पाहता येणार आहे. निकालानंतर गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेची छायाप्रत आणि पुनर्मूल्यांकनासाठी १५ ते २४ जुलै या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. पुनर्मूल्यांकनासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असल्याचे राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी स्पष्ट केले आहे.

# करंजाडे स्मशानभूमीत अंधाराचे साम्राज्य



**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

करंजाडे तलावालगत असलेल्या स्मशानभूमीतील मूलभूत सुविधांचा अभाव पुन्हा एकदा उघड झाला आहे. करंजाडे येथील रहिवासी जैस्वाल यांच्या वडिलांच्या अंत्यसंस्कारावेळी संपूर्ण स्मशानभूमी अंधारात असल्याने नातेवाईक आणि उपस्थित नागरिकांना मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात अंत्यविधी पार पाडावे लागले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

अंत्यसंस्कारासाठी मोठ्या संख्येने नातेवाईक आणि नागरिक स्मशानभूमीत दाखल झाले होते. मात्र, तेथे वीजपुरवठा आणि प्रकाशव्यवस्थेचा पूर्णपणे अभाव असल्याने धार्मिक विधी करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि बाहेरगावाहून आलेल्या नातेवाईकांना पान ५ वर

# पंढरीच्या वाटेवर रक्ताचा सडा

- तीन वारकरी महिलांचा मृत्यू, चार गंभीर
- जेजुरीत पालखी सोहळ्यावर शोककळा








**। पुणे । प्रतिनिधी ।**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यादरम्यान पंढरपूरच्या पवित्र वारीवर सोमवारी काळाने घाला घातला. सासवड-जेजुरी मार्गावरील बेलसर टोलनाक्याजवळ दिंडीतील ट्रकने सात वारकरी महिलांना चिरडल्याने तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर चार महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. या भीषण अपघातामुळे संपूर्ण पालखी सोहळ्यावर शोककळा पसरली असून, लाखो वारकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

जेजुरीत पालखीचे आगमन झाल्यानंतर ही दुर्दैवी घटना घडली. नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील रघुनाथ महाराज पोखरबिसीकर दिंडीतील ट्रकने साईदीप लॉजजवळ सात वारकरी महिलांना धडक दिली. गंभीर जखमींना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच तीन महिलांचा मृत्यू झाला.

मृत महिलांमध्ये नंदा पवार (६०), माधवी राजाराम सलगरे (५५) आणि राजश्री शंकर भोसले (५५) यांचा समावेश असून, त्या सांगली जिल्ह्यातील रहिवासी होत्या. जखमींवर जेजुरीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ट्रक चालकाला पोलिसांनी पान ५ वर

## माथेरानमध्ये पर्यटकांचा टेम्पो कलंडला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान-नेरळ घाट मार्गावर पर्यटकांनी भरलेला मालवाहू टेम्पो रविवारी सायंकाळी अपघातग्रस्त झाल्याने सात पर्यटक जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले आहे. याप्रकरणी नेरळ पोलिसांनी टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

रविवारी सुट्टी असल्याने माथेरान येथे पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. सायंकाळी परतीच्या वेळी टॅक्सीची कमतरता असल्याने पर्यटकांना दीड ते दोन तास प्रतीक्षा करावी लागत होती. त्यामुळे अनेकांनी मिळेल त्या वाहनातून नेरळ गाठण्याचा पान ५ वर

## राज्यात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्यानंतर आता पुढील २४ तासांत महाराष्ट्रासह देशातील २१ राज्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, काही ठिकाणी ताशी ७० ते ७५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, नागरिकांनी तसेच मच्छिमारांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, महाराष्ट्रातही पुढील एक-दोन दिवसांत पावसाचा जोर पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, यामुळे पावसाअभावी चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

### प्रसूतीसाठी गर्भवतीचा सात किलोमीटरचा प्रवास | गोंडस बाळाला जन्म, आई-बाळ सुखरूप

# विकास कागदावर, बाळंतपण डोलीतून!

**संतोषी म्हात्रे**

**। खोपोली ।**

एकीकडे विकासाच्या घोषणा, अमृत महोत्सव आणि सर्वांसाठी आरोग्यचे दावे होत असताना, रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील उंबरणे-वरोसे आदिवासी वाडीने शासनाच्या विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर मनीषा अनंत पारधी यांना रस्ता नसल्याने ग्रामस्थांनी चादरीची डोली करून तब्बल सात किलोमीटर दऱ्या, डोंगर आणि जंगलातून खांद्यावर वाहात




चौक ग्रामीण रुग्णालयात आणले. मात्र, चौक ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे अवघ्या तासाभरात त्यांनी ३ किलो १०० ग्रॅम वजनाच्या गोंडस मुलाला जन्म दिला. सध्या आई आणि बाळ दोघेही सुखरूप असून, या घटनेने दुर्गम आदिवासी भागातील मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पान ५ वर


### डोलीच आमची रुग्णवाहिका

उंबरणे-वरोसेसारख्या आदिवासी वाडीत आजही पक्का रस्ता नाही. पावसाळ्यात गावाचा संपर्क तुटतो आणि आजारी व्यक्ती, गर्भवती महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांना डोलीतूनच दवाखान्यात आणावे लागते. पुनर्वसन, रोजगार आणि मूलभूत सुविधांची आश्वासने अनेकदा मिळाली; मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत बदल झालेला नाही. त्यामुळे विकास नेमका कोणासाठी? असा संतप्त सवाल आदिवासी बांधव उपस्थित करत आहेत.

> मनीषा पारधी यांना दाखल होताच तातडीने उपचार सुरू करण्यात आले. नैसर्गिक प्रसूती यशस्वी झाली असून, आई आणि बाळ दोघेही पूर्णपणे सुरक्षित आहेत. आमचा संपूर्ण कर्मचारी वर्ग त्यांच्या प्रकृतीवर चोवीस तास लक्ष ठेवून आहे. अशा दुर्गम भागातून येणाऱ्या रुग्णांसाठी आरोग्य यंत्रणा नेहमी सज्ज असते.
>
> – डॉ. सविता काळेल, वैद्यकीय अधिकारी, चौक ग्रामीण रुग्णालय

# खाकीचा वचक संपला ?





- चक्क पोलीस पाटलालाच लोखंडी रॉडने बेदम मारहाण
- आठ जणांवर गुन्हा दाखल

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या पोलीस पाटलालाच भररस्त्यात लोखंडी रॉडने बेदम मारहाण होत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा कोणाच्या भरोशावर, असा संतप्त सवाल सुधागड तालुक्यात उपस्थित होत आहे. रायगड जिल्ह्यातील नेरे गावचे पोलीस पाटील चंद्रकांत नथुराम पोकळे यांच्यावर जुन्या वादातून आठ जणांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी पाली पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी पोकळे यांच्या पान ५ वर

# स्वखर्चाने अलिबाग आगाराची स्वच्छता



| अलिबाग | प्रतिनिधी |

मुसळधार पावसानंतर अलिबाग एसटी आगारात साचलेल्या चिखल, गाळ आणि कचऱ्यामुळे प्रवासी तसेच एसटी कर्मचाऱ्यांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. ही समस्या समजताच माजी नगराध्यक्ष तथा अलिबाग नगर परिषदेचे विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी तातडीने पुढाकार घेत स्वखर्चाने जेसीबी उपलब्ध करून आगार परिसराची स्वच्छता करून घेतली. त्यांच्या या तत्परतेमुळे आगार पुन्हा स्वच्छ व सुरक्षित झाल्याने प्रवासी आणि एसटी कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त करत त्यांचे आभार मानले.

अलिबाग एसटी आगार हे रायगड जिल्ह्यातील प्रमुख वाहतूक केंद्र असून दररोज हजारो प्रवासी या आगारातून प्रवास करतात. अलीकडील पावसामुळे आगार परिसरात मोठ्या प्रमाणात गाळ, चिखल आणि कचरा साचल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. अस्वच्छतेमुळे आरोग्याच्या दृष्टीनेही चिंता निर्माण झाली होती.

आगारातील वाहन निरीक्षक दिलीप पालवणकर आणि कर्मचाऱ्यांनी ही बाब प्रशांत नाईक यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी विलंब न लावता परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर तातडीने जेसीबी यंत्रणा उपलब्ध करून आगार परिसरातील साचलेला गाळ आणि चिखल हटविण्याचे काम हाती घेण्यात आले. काही तासांतच परिसराची स्वच्छता पूर्ण झाल्याने आगाराचे रूप पालटले.

या कामाबद्दल वाहन निरीक्षक दिलीप पालवणकर, आगार प्रशासन आणि एसटी कर्मचाऱ्यांनी प्रशांत नाईक यांचे आभार मानत, सार्वजनिक प्रश्नांवर त्यांनी दाखविलेली तत्परता आणि संवेदनशीलता कौतुकास्पद असल्याची भावना व्यक्त केली. नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी लोकप्रतिनिधींनी अशाच प्रकारे पुढाकार घेणे आवश्यक असल्याचेही अनेकांनी नमूद केले.

## चिखल हटविण्यास प्रशांत नाईक यांचा तातडीचा पुढाकार

---

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that (i) Mr. Jehangir Dhan Mistri, (ii) Ms. Meher Jehangir Mistri and (iii) Ms. Shireen Jehangir Mistri ("Clients") have entered into a Memorandum of Understanding dated 11.02.2026 with Mrs. Guloo Pervez Dastur ("Owner") in respect of the property (which includes main bungalow, various other structures, pump house, swimming pool, trees standingthereon, etc. which carefully furnished/equipped with furniture, fittings, artefacts, household goods and equipment etc.)more particularly described in the First Schedule hereunder written ("Land and buildings with fittings") along with right of way to the said Property more particularly described in the Second Schedule hereunder written ("Right of Way Lands") (said Land and buildings with fittings and said Right of Way Lands are hereinafter referred to as "Said Property") and therefore, no one shall deal or enter into any transaction with the said Owner i.e., - Mrs. Guloo Pervez Dastur, R/At - "Bellevue", 57 Behramjee Jeejeebhoy Road, Bandra (West), Mumbai, 400050 in respect of the said Property. However, my Clients have understood that with a view to defeat the legitimate claim of my Clients, said Owner is proposing to create third party rights in the said Land and buildings with fittings, as well as Right of Way Lands (ie., - said Property).

In view of the above, Notice is hereby given to public at large that my Clients have first right over the said Landand buildings with fittings as well as Right of Way Lands (ie., - said Property) presently owned by the Owner. Therefore, any agreement, sale deed, memorandum of understanding, mortgage deed, gift, leave and license, lease or any type of transfer orcreation of any rights whatsoever, etc. executed by any third party with the owner are illegal, invalid and void ab initio, and that my Clients strongly object to such type of deeds or documents executed with the Owner in respect of the said Land and buildings with fittingsas well as Right of Way Lands (ie., - said Property).

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the Property being Land and Buildings with fittings)**

A. Non-Agricultural land bearing Gut No 261/1/2 (part) (old Gut No 982/1 (part)) situated at village Tekali/Awas, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra admeasuring (approx.) 55-7 gunthas.
B. Non-Agricultural land bearing Gut No 262 (old Gut No 983) situated at village Tekali/Awas, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra admeasuring (approx.) 23-3 gunthas.
C. Agricultural land bearing Gut No 61/1 (old Gut No 985) situated at village Tekali/Awas, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra admeasuring (approx.) 14-5 gunthas.
D. A ground plus 1st floor main bungalow/villa admeasuring approx 11,000 sq. ft. carpet area having 5 bedrooms/5 en-suite bathrooms, living room, dining room, kitchen, utility/store rooms, & various covered porches, balconies/ sit out areas, the entire bungalow being air-conditioned, fully furnished and equipped with furniture, fittings, household furnishing. artefacts, household goods, electrical and kitchen equipment etc.
E. A stand-alone separate gazebo admeasuring approx. 225 sq. ft. carpet area. F. Three (3) stand-alone separate Staff Rooms with attached bathrooms admeasuring approximately 1,000 square feet (carpet area).
G. Two (2) stand-alone separate Store Rooms admeasuring approximately 225 square feet (carpet area) each.
H. A double garage, 3 borewells, dedicated 63KVA Transformer, 32KVA Generator set, inverters, Solar panels, household stabilizer.
I. Mature, laid out garden with lawns, swimming pool, various fruit trees on various parts of the property, complete boundary wall/fencing with 2 (two) gates (one electric) for access control

**THE SECOND SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Right of Way Lands)**

A. A transferable Right-of-way on a road 385 ft long and 16 ft in width admeasuring (approx.) 5-18 gunthas, running from North to South on Non- Agricultural land admeasuring (approx) 29-84 gunthas being part of Gut No 260/2/A (old Gut No 981/B) situated at Village Tekali/Awas, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.
B. A Right-of-Way by a 10-foot-wide road running North-South, admeasuring approximately 4-5 gunthas over/ adjacent to Agricultural land bearing Gut No 61/1 (old Gut No 985) situated at Village Tekali/Awas, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra.

**Adv. S. Y. Bartake**
Office At B/202, Kuberakshe CH.S., Near Maruti Naka Alibag. Taluka Alibag, District Raigad, 402 201.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे धोंडसे, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकती.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/ स.नं./ प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. अर्जुन अनाजी मोरे. | ४५/३ | ०-४१-०० | ०-०६ |

तरी वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १३/०७/२०२६

खरेदीदारांतर्फे
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ, राठोड सदन ऑफिस नं.७,
पाली, ता. सुधागड, जि. रायगड. ४१०२०५
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

---

## सार्वजनिक जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलाने खाली नमूद केलेल्या मालमत्तेबाबत मूळ मालकाशी विधिपूर्वक सामंजस्य करार (Memorandum of Understanding-MOU) केलेला असून त्या करारानुसार ठरलेला संपूर्ण/मोठा मोबदला अदा करण्यात आलेला आहे व त्याची पावतीही मालकाने दिलेली आहे.

सदर व्यवहार पूर्णत्वास आलेला असून केवळ मालकाकडून महसुली नोंदी, फेरफार, ७/१२ उतारा, आवश्यक परवानग्या, इतर कायदेशीर औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर अंतिम खरेदीखत नोंदणी करावयाचे आहे. त्यामुळे सदर मालमत्तेबाबत आमच्या अशिलाचे पूर्वीपासून वैध, कायदेशीर व करारनिहाय हक्क निर्माण झालेले आहेत. म्हणून सर्व संबंधितांना यानिमित्ताने स्पष्ट इशारा देण्यात येतो की, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीने, संस्था, कंपनी, विकासक, बिल्डर, बँक, वित्तीय संस्था किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने खरेदी, विक्री, करार, सामंजस्य करार, विकास करार, गहाण, तारण, भाडेपट्टा, परवाना, हस्तांतरण, देणगी, अदलाबदल अथवा कोणत्याही प्रकारचे तृतीय पक्ष हक्क अथवा हितसंबंध निर्माण करू नयेत.

या सार्वजनिक सूचनेनंतर कोणीही अशा प्रकारचा व्यवहार केल्यास तो स्वतःच्या संपूर्ण जोखमीवर, खर्चावर व परिणामांना सामोरे जाऊन करीत आहे, असे समजण्यात येईल. अशा व्यवहारामुळे आमच्या अशिलाच्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या कायदेशीर व करारनिहाय हक्कांवर कोणताही परिणाम होणार नाही.

सदर मालमत्तेबाबत कोणाचा काही हक्क, दावा, स्वारस्य किंवा हरकत असल्यास त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे जोडून लेखी हरकत खाली सही करणाऱ्या वकिलांकडे सादर करावी. अन्यथा कोणालाही कोणताही दावा किंवा हरकत नाही असे गृहित धरले जाईल आणि त्यानंतर होणारे सर्व व्यवहार आमच्या अशिलांच्या कायदेशीर हक्कांच्या अधीन राहतील.

**मालमत्तेचे वर्णन**

मौजे कारचुंदे, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील सर्वे नं. ७/१, क्षेत्रफळ ०२-२३-०० (हे.आर) आणि सर्वे नं. ८/३ क्षेत्रफळ ०१-१३-३० (हे.आर) चा संपूर्ण भूखंड

दिनांक : ०६-०७-२०२६
स्थळ : ठाणे
सही/-
**श्री. विशाल सिंह**
व्ही.आर.लीगल अँड कंपनी
अधिवक्ता व कायदे सल्लागार
मो. ९९२०३९०९५९
Adv.vrlegal@gmail.com

---

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, हरेश्वर यादव पाटील, विश्वास दयानंद पाटील, शशीकला नरेश पाटील, उदय मंथन म्हात्रे, संतोष भास्कर गावंड, सुधाकर दयानंद पाटील, शांता यादव पाटील, चंद्रभागा चंद्रकांत पाटील, नलिनी नवनीत पाटील, पंकज मंथन म्हात्रे. मयुरी वासुदेव पाटील, रविंद्र भास्कर गावंड, राधाबाई भास्कर गावंड, वासुदेव भास्कर गावंड आणि जगन्नाथ आत्माराम गावंड यांची सामाईक शेतमिळकत कायम खरेदीखताद्वारे विकत देण्याचे ठरविले आहे. सदरचे मिळकतीबाबत शेतकरी लवकरच खरेदीखत करण्याच्या बेतात आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वशेणी, ता. उरण, जि. रायगड.**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ११४ | ३ | ०-१४-००<br>०-०५-०० पो. ख.<br>एकुण क्षेत्र ०-१९-०० गुंठे | ०.३४ |
| २ | ११४ | १५ | ०-२३-०० गुंठे<br>०-०६-०० पो. ख.<br>एकुण क्षेत्र ०-२९-०० गुंठे | ०.४९ |

तरी वरील मिळकतीचे वर्णनांत नमुद शेतमिळकतींबाबत कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद, असल्यांस त्याच्या लेखी हकरती त्यांचे हरकतीतील नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत माझे खालील पत्त्यावर पाठवून द्यावी. उपरोक्त दिवसांत जर कोणाकडून कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार खालील पत्त्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १३/०७/२०२६

सही/-
**ॲड. किशोर धनाजी ठाकुर**
कार्यालय : ऑफीस क्र. २, जय भवानी संकुल,
जय भवानी पेट्रोल पंप जवळ, जे. एन. पी. टी
कळंबोळी रोड, पौंडखार गाव, पो. जासई
(व्हाया पनवेल - ४१०२०६) ता. उरण, जि. रायगड.

---

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई निविदा जाहिर सुचना

खालील कामाकरीता नामांकित आणि पंजीकृत ठेकेदारांकडून ई निविदा बोलाविण्यांत येत आहे.
निविदेचा तपशील खाली देण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचा तपशील | निविदा रक्कम/ निविदा अनामत/ निविदा मुल्य | निविदा विक्री/ खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | काअ / पनवेल ग्रा. / तां. / निविदा ०५ / २०२६-२७ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोर्स मधुन प्राप्त झालेले मटेरियल आणि इकिविपमेंट (९ मिटर टन पर्यंत) वाहतूक व सामुग्री हाताळणीच्या कामाचा ठेका. | रू. ५.०० लाख<br>रू.५०००/.<br>रू. ११८० /. | १०.०७.२०२६ पासून<br>२०.०७.२०२६ |

**कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल (ग्रा) विभाग**

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**पत्ता-कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा- ठाणे**

ईमेल- eemsddkalwa@yahoo.co.in  दुरध्वनी क्र-०२२-२५३७४७७०

**ई निविदा सूचना क्र. ०७ सन २०२६-२०२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा- ठाणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा B-1 नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथुन डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई निविदा सूचना व निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव | पन्हाळघर उजवा तीर कालवा व डावा तीर कालवा, जि. राजगड येथे स्लुईस/बटरफ्लाय व्हॉल्व्ह ०.३ मी व्यास (२४ नग) व ०.६ मी व्यास (२ नग) चा पुरवठा व उभारणी करणेचे कामे. |
| | जिल्हा | रायगड |
| | निविदेची किंमत रुपये | रु.३७,३३,१७२/- |
| २. | कामाचे नांव | हेटवणे धरण सांडव्यावरील उभे उचल द्वार (६ मी.X३ मी-६ नग) व उच्चालक (डबल स्टेम टाईप) ७.५ मे. टन दुरुस्ती अंतर्गत नवीन लाईन शाफ्ट बसवणे, तसेच. सांडव्यावरील केबल, वायरींग, पॅनल विद्युत घटक भागांचे दुरुस्ती अनुषंगिक यांत्रिकी विद्युत कामे. |
| | जिल्हा | रायगड |
| | निविदेची किंमत रुपये | रु.२३,६०,६२५/- |
| ३ | कामाचे नांव | हेटवणे धरणावर सिडको आऊटलेट येथील आपत्कालीन द्वार २.२३२ मी.X २.५० मी. - १ नग द्वार वरती स्टोर/रेस्ट करण्यासाठी उपाययोजना करणे तसेच सिडको विमोचकावरील केबल, वायरींग, पॅनल विद्युत घटक भागांचे दुरुस्ती अनुषंगिक यांत्रिकी व विद्युत कामे. |
| | जिल्हा | रायगड |
| | निविदेची किंमत रुपये | रु.२३,६६,२००/- |
| ४ | कामाचे नांव | हेटवणे मध्यम प्रकल्प ता. पेण, जि.रायगड धरणावरील ICPO आऊटलेट सेवाद्वारे DSSG (सिंचनासह विद्युतविमोचक बोगदा निम्नबाजु) - १.५० मी.X२.४० मी.संख्या १ नग द्वाराचे उचलदर्शकासाठी Digital Height Indicator व Earthing mat बसविणे अनुषंगिक यांत्रिकी व विद्युत कामे. |
| | जिल्हा | रायगड |
| | निविदेची किंमत रुपये | रु.०६,५४,३३९/- |
| निविदा उपलब्ध कालावधी | | दिनांक:१७/०७/२०२६ ते दिनांक: २४/०७/२०२६ |
| निविदा उघडण्याचा दिनांक | | दिनांक : २७/०७/२०२६ |

जा.क्र. यांभाविवि/लेशा-२/१२५९/सन- २०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा- ठाणे.
दिनांक-०९/०७/२०२६

सही/-
**(सं.ना. रोकडे)**
कार्यकारी अभियंता
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा- ठाणे

**विमाका/कोवि/२०२६-२०२७/५५**

---

## जाहीर नोटीस

**दि.१२/०७/२०२६**
**जा.क्र.७२८/२०२६**

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | १३७४/५ | राणे बिल्डींग अलिबाग रेवस रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ५५६ चौ.फुट | जनार्दन काशिनाथ राणे | सचिन जनार्दन राणे व इतर |
| २ | ४ | १९९३/१२ | ॲकॉन्स ट्रन्कूल ए विंग गोंधळपाडा चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुसरा मजला ३५० चौ.फुट | पुजा मुकुंदराज चाटे | पुजा मुकुंदराज चाटे संस्कार मुकुंदराज चाटे, रूद्र मुकुंदराज चाटे, विमल भगवान चाटे |
| ३ | २ | १५९५/१० | सिमरन सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका दुसरा मजला ८९० चौ.फुट | अकबर अहमद मुजावर परवीन अकबर मुजावर | शाहिद इसामुद्दीन कडवेकर, |
| ४ | ४ | १५५१/१ | स्वानंद सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका चौ.फुट | प्रिती प्रधान | प्रिती नितीन देशपांडे |
| ५ | ४ | २१०४/२ | निर्वाणा सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम सदनिका ६३५ चौ.फुट | ललिता शिवाजी गायकवाड | रामदास गंगाराम फुलमाळी |
| ६ | २ | १३७४/ | राणे बिल्डींग अलिबाग रेवस रस्ता | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला सदनिका ३६६ चौ.फुट | श्रीमती.सुशिला काशिनाथ राणे | प्रशांत रघुवीर पालेकर |
| ७ | ४ | २१०४/७ | निर्वाणा सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ मजला सदनिका ५८१ चौ.फुट | जय चामुंडा डेव्हलपर्स तर्फे फेनिल रतिलाल पटेल | साक्षी सुजय तेलगे, सुजय शांताराम तेलगे |
| ८ | ५ | १५०५/६ | उषःकाल सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला सदनिका ५६० चौ.फुट | अतुल काशिनाथ तासकर | निलम राजेश जाधव |
| ९ | ४ | १४७७/१० | नवदुर्वांकूर सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६६२ चौ.फुट | तक्षशिला समिर चौवल, समिर शरद चौवल | शोधन किरण ठाकूर |
| १० | २ | | प्रकाश हौ. सोसा, | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम रो हाऊस ६९६ चौ. फुट | अभिजित ज्ञानदेव दळवी | अदविका अभिजित दळवी |
| ११ | ४ | १९८३/३ | बालाजी पाल्मस | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला चौ.फुट | रोमिता राजेंद्र माने, धिरज राजन शिंदे | चेतना चंद्रकांत कडवे |
| १२ | ५ | १०९७/२४ | संकुल सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ४३२ चौ.फुट | अजित भिकाजी म्हात्रे व इतर | आसावरी यतिन मोकल |

सही/-
**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे ता.अलिबाग**

# नि|व|ड|क

## रस्त्यांच्या तात्काळ दुरूस्तीची मागणी

**माथेरान :** माथेरानला सर्वाधिक पावसाची नोंद झाली असून, जवळपास १७०० मिमी एवढ्या जोराची पर्जन्यवृष्टी झाली आहे.



त्यामुळे येथील बहुतेक ठिकाणी पॉईंट्सकडे जाणाऱ्या रस्त्यांची अक्षरशः वाताहत झाली आहे. मुळातच रस्त्याच्या सुरक्षेसाठी पावसाळ्यापूर्वी जागोजागी बंधारे टाकणे आवश्यक असताना देखील रस्त्यांचे नियोजन न केल्यामुळे त्याचा नाहक त्रास पर्यटक तसेच घोडेवाल्यांना सोसावा लागत आहे. याकामी ताबडतोब या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, या आशयाचे निवेदन नगरसेविका अनुसया अतिष ढेबे यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिले आहे. या निवेदनात, रस्त्यांची वाताहत झाल्यामुळे पायी चालत जाणाऱ्या पर्यटकांना त्याचप्रमाणे घोडेस्वारी करणाऱ्या पर्यटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून, खड्डेमय रस्त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने संबंधित विभागाला सूचना देऊन युद्धपातळीवर सर्वच रस्त्यांची डागडुजी करावी. जेणेकरून कुणालाही त्रासाला तोंड द्यावे लागणार नाही, असे अनुसया ढेबे यांनी नमूद केले आहे.

## नटराजच्या नावाने ऑनलाईल फसवणूक

**श्रीवर्धन :** ऑनलाइन फ्रॉड करणारे ठग नवीन कोणते ना कोणते साधन आजमावतच असतात. अशाच प्रकारे ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्या ठगांनी आता नटराज पेन्सिल कंपनीच्या नावाने नवीन फ्रॉड करण्याचा धंदा सुरू केला आहे. नटराज कंपनीच्या पेन्सिल किंवा पेन पॅक करण्याचे काम आपणाला मिळेल. काम आपल्याला घरपोच




दिले जाईल व महिन्याला या बदल्यात आपल्याला ३० हजार रुपये मिळतील, अशा प्रकारे फोनवरती हे लोक बतावणी करत असतात. पहिले आपले नाव रजिस्टर करण्यासाठी रुपये ६५० रूपये ऑनलाइन टाकायला सांगतात. त्यानंतर आता माल घेऊन आमची गाडी निघणार आहे. त्यासाठी इन्शुरन्सचे २ हजार ५९९ रुपये त्वरित ऑनलाईन टाका. अशा प्रकारे सांगण्यात येते. आपण इन्शुरन्सचे पैसे ऑनलाईन टाकल्यानंतर सातारा येथून माल घेऊन गाडी लगेच निघेल व चार ते पाच तासांमध्ये आपल्याकडे माल देऊन जाईल. या गाडीसोबत पॅकिंग कशी करायची हे दाखवण्यासाठी एक महिला व एक पुरुष देखील उपलब्ध असेल. त्याचप्रमाणे आपल्याला कामासाठी १५ हजार रुपये ॲडव्हान्स कॅश देखील या गाडीसोबत पाठवण्यात येईल. तसेच एक नवीन मोबाईल सेट सुद्धा देण्यात येईल. असे आपल्याला फोनवरून सांगण्यात येते व तशा प्रकारचे फोटो व व्हिडिओ देखील आपल्याला पाठवण्यात येतात. त्यामुळे फसवणुक करणाऱ्या व्यक्ती आपण पैसे लवकरात लवकर ऑनलाइन टाका असे सांगत असतात. मात्र, तो माल काही आपल्यापर्यंत पोहोचत नाही. फसवणूक करणाऱ्या व्यक्तीचे नाव विपिन वर्मा असे येत असले तरी, ट्रू कॉलर वर नाव शोधले असता मोमीन नावाचा मोबाईल नंबर आढळून येतो. तसेच, चंचल कुमारी व मुबारक अशी नावे ऑनलाईन पेमेंट करण्यासाठी पाठवलेल्या स्कॅनरवर दिसून येते.

## खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण

**पनवेल :** तळोजा फेज-१ परिसरातील प्रमुख रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनचालक व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना



करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका प्रगती कैलाश पाटील व कैलाश बबन पाटील यांनी संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत परिसरातील सर्व प्रमुख रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे वाहनचालक, पादचारी तसेच शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित व सुलभ प्रवास करणे शक्य झाले असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. याबाबत नगरसेविका प्रभाग क्रमांक ३ यांच्यावतीने सांगण्यात आले की, नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा व इतर विकासकामांसाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील. खड्डेमुक्त रस्त्यांमुळे अपघातांची शक्यता कमी होण्यास मदत होणार असून, वाहतुकीलाही गती मिळणार आहे. स्थानिक नागरिकांनीही या कामाबद्दल समाधान व्यक्त करत नगरसेविका प्रगती कैलाश पाटील व कैलाश बबन पाटील यांचे आभार मानले आहेत.

# संवेदनशील नेतृत्व : संतोष पाटील



**बाबा शेख**

लोकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारे, साधेपणातून मोठेपणा जपणारे, हसतमुख, प्रेमळ, संवेदनशील आणि उदार मनाचे व्यक्तिमत्त्व, तरुणाईचे प्रेरणास्थान, सहकार व समाजकारणातील विश्वासार्ह नेतृत्व, हरिग्रामचे सुपुत्र, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान संचालक तथा कृषी उत्पन्न बाजार समिती, पनवेलचे माजी संचालक आदरणीय संतोष हरिभाऊ पाटील (दादा) यांना वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा!

आज दादांच्या वाढदिवसानिशित्त काही शब्द लिहिण्याचा प्रयत्न करतोय; पण खरं सांगायचं तर दादांसारख्या विशाल व्यक्तिमत्त्वाला शब्दांच्या चौकटीत बांधणं अशक्य आहे. कारण काही माणसं पदामुळे मोठी होत नाहीत, तर त्यांच्या विचारांमुळे, स्वभावामुळे, माणुसकीमुळे आणि कार्यामुळे लोकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करतात. संतोष दादा हे त्यापैकीच एक. सामान्य कुटुंबातून आलेले हे व्यक्तिमत्त्व संघर्षाच्या प्रत्येक वळणावर खंबीरपणे उभे राहिले. कोणताही राजकीय वारसा नसताना केवळ कष्ट, जिद्द, प्रामाणिकपणा आणि लोकांशी जोडलेलं नातं यांच्या बळावर त्यांनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं. शून्यातून विश्व निर्माण करणं, ही म्हण त्यांच्या जीवनप्रवासाला अगदी तंतोतंत लागू पडते. दादांचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांचा माणुसकीचा स्वभाव. त्यांच्या दारातून कोणीही निराश परत जात नाही. संकटात सापडलेल्या माणसासाठी ते आधारवड बनतात. एखाद्याच्या डोळ्यातील अश्रू पुसताना त्यांना स्वतःच्या पदाचा किंवा प्रतिष्ठेचा कधीही अभिमान वाटत नाही. म्हणूनच दादांवर प्रेम करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात काम करताना त्यांनी केवळ पदं भूषवली नाहीत, तर त्या पदांना न्याय दिला. कार्यकर्त्यांवर प्रेम, ज्येष्ठांचा सन्मान आणि युवकांना संधी देण्याची त्यांची वृत्ती त्यांना इतरांपेक्षा वेगळं ठरवते. पक्ष कोणताही असो, विचार वेगळे असोत; पण माणुसकीच्या नात्याने सर्वांना जोडण्याची ताकद दादांमध्ये आहे. त्यामुळेच महाराष्ट्रभर त्यांचे असंख्य स्नेही आणि शुभेच्छुक आहेत.

दादांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे संस्कार. आधुनिक राजकारणात कार्यरत असूनही त्यांनी आपल्या संस्कृतीची आणि कुटुंबमूल्यांची कधीही साथ सोडली नाही. आई-वडिलांना विठ्ठल-रुक्मिणी मानून त्यांच्या चरणी नतमस्तक होणारा हा वारकरी स्वभाव आजच्या पिढीसाठी आदर्श आहे. मोठेपण मिळालं तरी पाय जमिनीवरच ठेवायचे, ही शिकवण त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येते. युवकांना प्रेरणा देणारे, कार्यकर्त्यांच्या सुखः-दुःखात सहभागी होणारे, गोरगरीबांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असणारे आणि प्रत्येकाशी आपुलकीचं नातं जपणारे दादा हे केवळ एक नेते नाहीत, तर हजारो कुटुंबांचा विश्वास आहेत. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त पांडुरंगाच्या चरणी एकच प्रार्थना, दादांना उत्तम आरोग्य, निरामय दीर्घायुष्य, अखंड यश, अधिक सामर्थ्य आणि जनसेवेची अविरत ऊर्जा लाभो. त्यांच्या हातून समाजहिताची अनेक सुवर्णपाने लिहिली जावोत. तसेच, त्यांनी असंख्य कार्यकर्त्यांना आणि युवकांना अशीच प्रेरणा देत राहावे, हीच विठ्ठल चरणी मनःपूर्वक प्रार्थना.

# जिल्हा परिषदेची विशेष शोधमोहीम

**| रायगड | प्रतिनिधी |**

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार या कायद्यांतर्गत जिल्ह्यातील ६ ते १४ वयोगटातील कोणताही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची विशेष शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी अंगणवाडीसेविका, प्राथमिक व माध्यमिक विभागाचे शिक्षक विविध ठिकाणी भेटी देऊन शाळाबाह्य मुले आढळल्यास त्यांना त्यांच्या वयानुसार इयत्तेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.




- **शाळाबाह्य मुलांना शोधून प्रवेश देणार**
- **३० जुलैपर्यंत मोहीम राबवणार**

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकाराच्या कायद्यांतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकांस शिक्षणाचा अधिकार आहे. यासाठी राजिप शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. साधारणतः सप्टेंबर महिन्यानंतर राज्यातील बऱ्याच जिल्ह्यांतून शेतमजूरांसह बांधकाम, कोळसा व वीटभट्टी कामगारांची कुटुंबे मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत असतात. त्यामुळे अनेक वेळा अशा कुटुंबातील मुलांचे शिक्षण अपूर्ण राहते. त्यामुळेच अशा मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी व त्यांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी विशेष शोध मोहीम दि.१५ ते ३० जुलैदरम्यान राबविण्यात येणार आहे. या कालावधीत स्थलांतरीत होऊन येणाऱ्या ३ ते १८ बयोगटातील प्रत्येक बालकास वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल करण्यात येणार आहे. तसेच, स्थलांतरीत होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांस शिक्षण हमीपत्र देण्यात येणार आहे.

दरम्यान, या कालावधीत रेल्वेस्टेशन, बसस्थानके, वस्ती, वीटभट्ट्या, शेतमजुर, बांधकाम कामगार, स्थलांतरीत कुटुंबे, झोपड्या, फुले व अन्य वस्तू विकणारी तसेच रस्त्यावर भिक मागणारी बालके इत्यादी ठिकाणी अंगणवाडीसेविका, शिक्षक भेट देऊन पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणार आहेत. तसेच, अशा शाळाबाह्य मुलांची माहिती घेऊन त्यांना वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल करण्यात येणार आहे. पालकांनीही या शोधमोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले यांनी केले आहे.

### स्थलांतरीत विद्यार्थ्याला शिक्षण हमीपत्र देणार

अनेकदा बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार वर्षातून २ ते ३ वेळा विविध ठिकाणी स्थलांतर करतात. अशा वेळी त्यांच्या मुलांचे शिक्षण थांबू नये व त्यांना दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी विद्यार्थ्याला शिक्षण हमीपत्र देण्यात येणार आहे.

## तोतया पोलिसांनी दागिने लुबाडले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

एक महिला येथील खांदेश्वर सोसायटी परिसरातून जात होत्या. त्यावेळी दुचाकीवरून त्यांच्याजवळ आलेल्या दोघांनी ते पोलीस अधिकारी असल्याचे भासवले. त्यानंतर त्यांनी पुढे काहीतरी गडबड झाल्याचे सांगून महिलेला अंगावरील दागिने काढून सुरक्षित ठेवण्यास बजावले. त्यांच्यावर विश्वास ठेवून महिलेने आपल्या अंगावरील ४ लाख ८० हजारांचे दागिने काढले असता, एकाने त्यांचे दागिने व्यवस्थित बांधून देण्याचा बहाणा करून आपल्याकडे घेतले. या चोरांनी हातचलाखी करून सर्व दागिने काढून घेतले आणि रिकामा कागद त्यांना देऊन तेथून पळ काढला.

## शेकाप कार्यकर्ते नरहरी म्हात्रे यांचे निधन

**| वाघ्रण | प्रतिनिधी |**

वन विभागाचे सेवानिवृत्त कर्मचारी तथा सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे तथा शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ व झुंझार कार्यकर्ते नरहरी म्हात्रे यांचे रविवारी (दि.१२) अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर श्रीक्षेत्र भुवनेश्वर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक तसेच वन विभागातील अधिकारी-कर्मचारी, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य दि.२३ जुलै रोजी श्रीक्षेत्र भुवनेश्वर येथे होणार असल्याची माहिती कुटुंबियांनी दिली. निधनाची बातमी समजताच शेतकरी



कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यासह अनिल गोमा पाटील, अभिजित पाटील, सत्यविजय पाटील, अनिल धुमाळ, अभिषेक पाटील, कौशिक पाटील, अमोल पाटील, अथर्व पाटील व शेकापच्या अन्य कार्यकर्त्यांसह नारंगी येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी म्हात्रे कुटुंबियांचे सांत्वन करत नरहरी म्हात्रे यांनी शेकाप आणि समाजकारणासाठी दिलेल्या योगदानाला उजाळा दिला.

# रेवदंडा-चौलच्या कांदळवनावर कचऱ्याचा घाला

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा-चौल बाह्यवळण रस्त्याच्या कडेला आणि लगतच्या खाडीत सर्रास कचरा टाकला जात आहे. त्यामुळे परिसरातील पर्यावरणासह कांदळवन धोक्यात आले आहे. प्लास्टिकसह विविध प्रकारचा कचरा थेट खाडीत फेकला जात असल्याने समुद्री जैवविविधतेवर विपरीत परिणाम होत असून, पर्यावरणप्रेमींनी याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

रेवदंडा-चौल बाह्यवळण मार्गालगत खाडीत फेकला जाणारा प्लास्टिकचा कचरा भरती-ओहोटीच्या पाण्यासोबत वाहत जाऊन कांदळवनाच्या मुळांमध्ये अडकून राहतो. त्यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होण्याबरोबरच पाण्याच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. त्याचा फटका कांदळवन परिसरातील वनस्पती, मासे, खेकडे, पक्षी आणि इतर जलचर जीवांना बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या समस्येचा परिणाम केवळ पर्यावरणापुरता मर्यादित नसून, पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचाही धोका वाढला आहे. चौल भाटगल्ली, मुखरी गणपती गल्ली इत्यादी भागांतील पावसाचे पाणी याच खाडीतून वाहून जाते. मात्र, कचऱ्यामुळे पाण्याचा निचरा अडथळला गेल्यास पावसाळ्यात पाणी घरांमध्ये शिरण्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली आहे.



- **बेफिकीर नागरिकांवर कारवाईची मागणी**

विशेष म्हणजे, परिसरात अधिकृत कचरा संकलनाची व्यवस्था आणि डंपिंगची सुविधा उपलब्ध असतानाही काही नागरिकांकडून बेजबाबदारपणे रस्त्याच्या कडेला व खाडीत कचरा फेकला जात असल्याने ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही बसविणे, नियमित स्वच्छता मोहीम राबविणे तसेच कांदळवन परिसरातील प्लास्टिकचा कचरा त्वरित हटविण्याची मागणी होत आहे.

## वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलमध्ये वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उरण-टाकीवाडा येथील मृणाल मनोहर जोशी हा दुचाकीवरून पिरकोन येथील साई सहारा हॉटेलसमोरील रस्त्यावर आल्यानंतर एका वाहनाने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. परंतु, अपघातानंतर संबंधित वाहनचालकाने घटनास्थळावरून पलायन केले. त्यानंतर उपस्थितांनी त्याला रूग्णालयात उपचारासाठी नेले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## वारसा जपणारे पुणेकर ढोलकीवाले

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**



पनवेल शहरातील तब्बल ११५ वर्षांची परंपरा लाभलेल्या पुणेकर ढोलकीवाले या दुकानाने सात पिढ्यांपासून भारतीय वाद्यनिर्मितीचा वारसा जपला आहे. आषाढी एकादशीच्या भक्तिमय वातावरणात वारकरी विठ्ठलाचा जयघोष करत मृदुंगाच्या तालावर पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत असताना या दुकानातही वाद्यनिर्मितीची लगबग सुरू आहे. येणाऱ्या गणेशोत्सव, दहीहंडी, नवरात्रोत्सव तसेच विविध धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कारागीर दिवस-रात्र वाद्य तयार करण्यात व्यस्त आहेत. या दुकानातून तयार झालेली वाद्ये राज्यासह देशभर पोहोचत असून अनेक नामवंत कलाकार, कीर्तनकार, भजन मंडळे आणि प्रसिद्ध वादकांनी येथून वाद्यांची खरेदी केली आहे. त्यामुळे पुणेकर ढोलकीवाले हे नाव वाद्यविश्वात विश्वासाचे प्रतीक मानले जाते. सात पिढ्यांनी जपलेला हा सुरेल वारसा आजही आधुनिक काळात तितक्याच निष्ठेने पुढे नेला जात आहे.

# ‘जेलमध्ये टाका अन् जेवण द्या’

### सफाई कामगारांचे पोलिसांना पत्र

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

प्रामाणिकपणे काम करूनही नवीन ठेकेदाराने आम्हाला कामावरून काढून टाकले आहे. आमच्यावर उपासमारीची वेळ आली असून, आम्हाला अटक करून जेलमध्ये टाकावे आणि आमच्या दोन वेळच्या जेवणाची व मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करावी, अशी संतप्त मागणी श्रीवर्धन नगरपरिषदेतील कंत्राटी सफाई कामगारांनी पोलिसांकडे केली आहे. कामगारांच्या या आक्रमक भूमिकेनंतर मनसेने देखील प्रशासनाला थेट इशारा दिला आहे.

श्रीवर्धन नगरपरिषदेत गेल्या १० ते १२ वर्षांपासून काही कंत्राटी सफाई कामगार हातावरचे पोट घेऊन काम करत होते. मात्र, नगरपालिकेत नवीन आलेल्या ठेकेदाराने या स्थानिक व जुन्या कामगारांना कामावर न घेता, परस्पर बाहेरून नवीन कामगार आणले आहेत. त्यामुळे त्यांचा एकमेव रोजगाराचा साधन हिरावला गेला आहे. या अन्यायाविरोधात संतप्त झालेल्या मंगेश बांद्रे, मिनाक्षी बांद्रे, प्रकाश साखरे, प्रियांका साखरे, सुनिल चिमण आणि सुजित पवार या कामगारांनी थेट श्रीवर्धन पोलीस ठाण्यात लेखी निवेदन दिले आहे. “आम्हाला कुठेही लगेच दुसरी नोकरी मिळणे शक्य नाही. त्यामुळे प्रशासनाने आजच आम्हाला अटक करून जेलमध्ये टाकावे, जेणेकरून रात्रीच्या जेवणाची तरी व्यवस्था होईल,” अशी उद्विग्न मागणी या कामगारांनी पत्रात केली आहे. “गरीब आणि अशिक्षित कामगारांवर कुणीही दबावाचे राजकारण करू नये, मनसे न्याय मिळेपर्यंत हा लढा सोडणार नाही,” असा आक्रमक इशारा देखील मनसे तालुकाध्यक्ष मृदास तोंडलेकर यांनी दिला आहे.

निसर्ग अन् मानवी नात्याचे सुंदर मिश्रण | पुणे-कोकण या दोन संस्कृतींचा सेतू

# ताम्हिणी घाट, स्वर्गीय प्रवास

**| माणगाव | सलीम शेख |**

पुणे आणि कोकणला जोडणारा ताम्हिणी घाट म्हणजे निसर्गाचे साक्षात सौंदर्यस्थळ. पावसाळा सुरू झाला की, सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यातून उगवणारे धबधबे, ढगांच्या कुशीत हरवलेली शिखरे, हिरव्यागार दऱ्या आणि गूढ शांतता या सगळ्याचे एक विलक्षण जादूई जग ताम्हिणी घाटात फुलते. त्यामुळे ताम्हिणी घाट हा केवळ पर्यटनासाठीचा मार्ग नाही, तर तो पुणे-कोकण या दोन संस्कृतींचा सेतू आहे. या मार्गाने प्रवास करताना सह्याद्री आपल्याशी थेट संवाद साधतो. प्रत्येक वळणावर तो नवे रहस्य उलगडतो.



कोकणचे कॅलिफोर्निया करण्याचे स्वप्न उराशी बाळगून तत्कालीन मुख्यमंत्री ए.आर. अंतुले यांनी १९८१ मध्ये रायगड आणि पुणे या दोन जिल्ह्यांना जोडणारा माणगाव-ताम्हिणी घाट-पुणे हा राज्य मार्ग मंजूर केला होता. मात्र, वनविभागाने पर्यावरणाचे संरक्षणाचे कारण देत २० वर्षे अडथळा निर्माण केला होता. तत्कालीन आमदार अशोक दादा साबळे यांनी पाठपुरावा केला. मात्र, सुनील तटकरे आमदार आणि पुढे मंत्री झाल्यावर अनेक अडथळे दूर करून यशस्वीपणे मार्गक्रमण करत हा राजमार्ग २००१ मध्ये प्रत्यक्षात सुरू करुन अंतुले यांचे स्वप्न साकार केले. त्यानंतर २०१९मध्ये दिघी-माणगाव-पुणे या महामार्गाचे दुपदरीकरण केल्यावर पर्यटकांची वर्दळ आणखी वाढली. तसेच,

### विकासाचा मार्ग अन् जबाबदारी

अलीकडील काळात ताम्हिणी घाटाचा रस्ता सुधारला गेला, नवे पूल आणि सुरक्षा भिंती बांधल्या गेल्या. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित झाला असला, तरी वाढत्या वाहनांमुळे कचरा, प्लास्टिक आणि ध्वनह प्रदूषण वाढू लागले आहे. आपण निसर्गाचा आनंद घेताना त्याला इजा पोहोचवू नये. ही जाणीव प्रत्येक प्रवाशामध्ये असायला हवी. “निसर्ग तुमचा पाहुणा नाही, तो तुमचा घरचा आहे” हे समजणं काळाची गरज आहे.

### सोयी-सुविधांचा मोठा अभाव

या निसर्गरम्य परिसरात पर्यटकांना कोणत्याही सोयी-सुविधा नसल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पावसाळ्यात अधिक पोलीस बंदोबस्त तैनात करावा, शासकीय विश्रामगृह नव्याने बांधावीत, वळणांवर दिशादर्शक फलक लावावेत, ठिक ठिकाणी प्रसाधनगृहे आणि शौचालये बांधावीत, अवघड आणि तीव्र उताराच्या ठिकाणी मजबूत लोखंडी कठडे उभारावेत, रुग्णवाहिका ठेववाव्यात, तसेच भविष्यात हा महामार्ग चौपदरी करण्यात यावा, अशा विविध मागण्या प्रवासी वर्गातून केल्या जात आहेत.

ताम्हिणी घाट हा केवळ एक मार्ग नसून सह्याद्रीच्या आत्म्याचा श्वास आहे. येथे निसर्ग, संस्कृती आणि मानवी नात्याचे सुंदर मिश्रण आहे.

# आंदोलनाच्या इशाऱ्याने महापालिका जागी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

खांदेश्वर शंकर मंदिर परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नागरी सुविधांच्या प्रश्नांवर अखेर पनवेल महानगरपालिकेला हालचाल करावी लागली आहे. परिवर्तन सामाजिक संस्था महाराष्ट्रचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी दि.१३ जुलैपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर महापालिकेच्या बांधकाम, उद्यान आणि आरोग्य विभागांनी स्वतंत्रपणे लेखी आश्वासन देत विविध रखडलेल्या कामांना गती देण्याचे स्पष्ट केले.

खांदेश्वर मंदिर परिसरातील तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने दुर्गंधी व डासांचा प्रादुर्भाव वाढला होता. उद्यानाची दुरवस्था, वाढलेले गवत, सार्वजनिक स्वच्छतागृह बंद, मोबाईल टॉयलेटची गैरसोय, तसेच संरक्षण भिंत व प्रवेशद्वारासंदर्भातील प्रलंबित कामांमुळे भाविक आणि स्थानिक नागरिक त्रस्त होते. या सर्व प्रश्नांवर परिवर्तन सामाजिक संस्थेने सातत्याने पाठपुरावा करून अनेक निवेदने दिली होती. मात्र, अपेक्षित कार्यवाही न झाल्याने महादेव वाघमारे यांनी आंदोलनाची घोषणा केली. त्यानंतर महापालिकेच्या संबंधित विभागांनी तातडीने दखल घेत लेखी उत्तर देत सर्व विकासकामे विहित प्रक्रियेनुसार पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

# तीजनबाई नावाची वीज

रामायण आणि महाभारत हे भारतीय संस्कृतीचे अंतःप्रवाह आहेत. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या सर्व समाजामध्ये या दोन्ही महाकाव्यांचे संदर्भ विविध तऱ्हांनी प्रकट होत असतात. याचा हिंदू किंवा कोणत्याही एका धर्माशी संबंध नाही. या दोन्ही महाकाव्यांच्या लिखित आवृत्त्या असल्या तरी मुळात त्या एक टक्काही लोकांनी वाचल्या असण्याची शक्यता नाही. तरीही बहुतांशी भारतीयांना रामायण महाभारतातले बारीकसारीक संदर्भ ठाऊक असतात. वनवास, वस्त्रहरण, लक्ष्मणरेषा अशासारख्या शेकडो कल्पना भारतातल्या सर्व भाषांमध्ये वापरल्या जातात. याचे कारण त्यांचा स्त्रोत एकच आहे. ही महाकाव्ये लोकांमध्ये इतकी रुजली ती आपल्या मौखिक परंपरेतून. आपल्याकडे भजन, कीर्तन, श्रावणातील कथावाचन, दसऱ्याला सादर होणारी रामकथा इत्यादींमधून ही काव्ये आणि त्यांच्या कथा लोकांमध्ये खोलवर झिरपलेल्या आहेत. शिवाय, प्रत्येकाने आपली आई, आजी, आजोबा इत्यादींकडून यातल्या कथा ऐकलेल्या असतात. या कथा सादर करण्याच्या भारतभरच्या परंपराही खास आपल्या देशाला साजेशा अनेकरंगी आहेत. यातलीच एक परंपरा म्हणजे छत्तीसगडची पंडवानी. एक कलाकार एका हातात तंबोरी नावाचे वाद्य घेऊन महाभारताची कथा सांगतो. या कलेला जागतिक स्तरावर घेऊन जाण्याचे काम एका महान महिला कलावतीने केले. तिचे नाव तीजनबाई. नुकताच त्यांचा मृत्यू झाला. आजच्या मोबाईल-इंटरनेट युगातल्या समाजाचे या जुन्या परंपरांशी असलेले नाते क्षीण होत आहे की काय अशी शक्यता त्या निमित्ताने बोलून दाखवली गेली. पण सुदैवाने तीजनबाईंची कला या नव्या माध्यमांमध्ये नोंदली गेलेली आहे. तिचे रेकॉर्डिंग झालेले आहे. त्यामुळे ती भावी पिढ्यांनाही पाहता येईल व त्यापासून प्रेरणा घेता येईल. तीजनबाई यांनी आपल्या कलेने पुरी दुनिया गाजवली. त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. १९८८ मध्ये पद्मश्री, १९९५ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार आणि २००३ मध्ये पद्मभूषण असे पुरस्कार मिळाले. १९८० च्या सुरूवातीस त्यांनी संपूर्ण जगभरात सांस्कृतिक राजदूत म्हणून इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी, तुर्की, ट्युनिशिया, माल्टा, सायप्रस, रोमानिया आणि मॉरिशस या देशांमध्ये प्रवास केला. त्यांनी जवाहरलाल नेहरू यांच्या पुस्तकावर आधारीत श्याम बेनेगल यांच्या प्रशंसित दूरदर्शन टीव्ही मालिका भारत एक खोजमध्ये महाभारतातील काही भाग सादर केले.

## कष्टमय जीवन

पण तीजनबाईंचे मोठेपण त्यांना मिळालेल्या सन्मानांमध्ये नाही. त्या जे जीवन जगल्या त्यामध्ये त्यांची आणि त्यांच्या कलेची महानता आहे. छत्तीसगडमधील बहेलिया पारधी या शिकारी आदिवासी समाजात त्यांचा जन्म झाला. खजुराची पाने गोळा करून त्यापासून झाडू व चटया करण्याचा उद्योग कुटुंबातल्या सर्वांप्रमाणे त्यांनाही लहानपणापासून करावा लागला. त्यापासून फार पैसे मिळत नसत. पण आदिवासींचे स्वच्छंदी जगणे मात्र त्या भरपूर जगल्या. त्यातून गरिबीची स्थिती असली तरीही नृत्य, गाणे यांचा छंद त्यांना लागला. त्यांचे वडील छनुकलाल पारधी वेळुची बासरी वाजवत. आई गाणी गाई. त्यांच्याकडून हा वारसा तीजनबाईंना मिळाला. अगदी लहानपणी त्यांचे लग्न लावून देण्यात आले. पण तीजनबाईंना अधिक रुची होती ती गाणे सादर करण्यात. त्यांचे आजोबा बृजलाल पारधी पंडवानी शैलीतील नामांकित कलाकार होते. पंडवानी ही महाभारताची कथा सादर करण्याची एक विशिष्ट शैली आहे. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी जवळपास स्वतंत्र रीतीने हे सादरीकरण सुरू केले. गॅसच्या बत्त्या आणि मशाली यांच्या उजेडात त्या महाभारताची संघर्ष लोकांपुढे उभा करत असत. त्यांच्या हातातील तंबुरी किंवा एकतारी ही वाद्य तर होतीच. पण ती भीमाची गदाही बनत असे. खड्या आवाजात आणि छत्तीसगडी बोलीमध्ये त्या मूळ संस्कृत महाकाव्यातील एकेक सर्ग सादर करू लागल्या की आपली संस्कृती किती खालपर्यंत झिरपलेली आहे हे लक्षात येई. त्यांचा पहिला बालविवाह यशस्वी झाला नाही. नंतर त्या तुकाराम वर्मा यांच्यासोबत राहू लागल्या. त्यांना दोन अपत्येही झाली. पण पुढे हा तुकारामच त्यांच्या कलेला विरोध करू लागला. पण पंडवानी माझा श्वास आहे असे बाणेदारपणे सांगून तीजनबाई त्या संसारातूनही बाहेर पडल्या. त्यानंतर त्यांच्या वाट्याला अतिशय कष्ट आले. कलेमधून त्यांना खूप प्राप्ती होत नव्हती. जगण्यासाठी झाडू बनवून विकणे चालूच होते. पण त्यांचे वैशिष्ट्य हे की, आपण एक कलाकार आहोत हे भान त्यांनी सोडले नाही.

## कलेतील संदेश

१९७० च्या उत्तरार्धामध्ये तीजनबाई यांचा खूप सन्मान झाला. भिलाई पोलाद उद्योगातील अधिकाऱ्यांना त्यांची कला आवडली. मग तेथे त्यांना नोकरी मिळाली. त्यातून स्थैर्य आले. त्यांचे आदिवासी शैलीतील नाटक अभिजन वर्गापर्यंत पोचू लागले. मग पद्मश्रीसारखे सन्मान मिळाले. इंदिरा गांधींनी कौतुक केले. त्यातून मग परदेशाचे प्रवास घडले. आपले नाटक त्यांनी जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोचवले व त्यांचीही मने जिंकली. हबीब तन्वीर वगैरेंसारख्या भारतीय नाट्यशास्त्राच्या अभ्यासक व दिग्गज कलाकारांना त्यांच्या कलेने मोहित केले. गुलजारांनी तर पंडवानी म्हणजे डोंगरदऱ्यातील झरा असा गौरव केला. युध्दे व संघर्षातून काहीही साध्य होत नाही, त्यापासून दूर राहा, स्त्रियांचा सन्मान करा असा संदेश तीजनबाईंच्या नाटकातून दिलेला असे. पण ते सरकारी प्रचारात्मक नाट्य कधी झाले नाही. शिवाय लढाया, हाणामाऱ्या किंवा स्त्रियांची स्थिती याबाबतची त्यांचे आकलन हे त्यांच्या जीवनातल्या अनुभवातून आले होते. पढीक पंडितांप्रमाणे कोण्या पुस्तकातून त्या हे शिकल्या नव्हत्या. किंबहुना, तीजनबाईंचे जीवन आणि त्यांची कला हे वेगळे करताच येणार नाही. एकातून दुसरे स्फुरले असा प्रकार त्यांच्या बाबतीत झाला. आपल्या कलेसाठी त्यांनी जमातीतील बुजुर्ग, त्यांच्या रुढी, परंपरा या सगळ्यांशी संघर्ष पत्करला. यामध्ये त्यांना यश मिळाले व त्या आपल्या सर्वांच्या समोर आल्या. दुर्दैवाने रुढीवादी समाज विजयी झाला असता तर त्यांचे नामोनिशाणही शिल्लक राहिले नसते. किंबहुना, अशा अनेक कलाकार स्त्रिया व पुरुषांचे असेच हाल अगदी आजही होत असतात. हे पाहता तीजनबाई यांनी आयुष्य पणाला लावून केवढी मोठी जोखीम पत्करली होती हे लक्षात यावे. त्यामुळे अर्थातच त्यांच्यातली कला, त्यांचे नाटक अधिक झळाळून उठले. सुदैवाने तीजनबाई यांच्या नाटकांचे पुरेसे चित्रीकरण झालेले आहे व भविष्यातील पिढ्यांनाही ते पाहता येईल. आज औद्योगीकरणाच्या रेटयामुळे आदिवासी आणि ग्रामीण समाज नष्ट होत चालले आहेत. शहरी आणि ग्रामीण असा काही फरकच उरलेला नाही. त्यामध्ये जुनी नाटक, संगीत, तमाशा, भजने, कीर्तने इत्यादींची परंपरा जीवित ठेवणे कठीण झाले आहे. शहरी नाटके व सिनेमे, आणि आता मोबाईलवरील रील्स यामध्ये या जुन्या गोष्टी गिळंकृत होण्याचा मोठा धोका आहे. त्यात बरीच भेसळही होऊ लागली आहे. अशा वेळी तीजनबाईंचे आयुष्य, त्यांची पंडवानीची कला आणि त्यातून त्या देत असलेला संदेश अत्यंत मोलाचा व प्रेरणा देणारा आहे. तीजनबाई नावाच्या विद्युल्लतेला सलाम.

विचार

# साखर आणि इलेक्ट्रिक वाहनांची तेजी

**सरत्या आठवड्यामध्ये काही अर्थवार्ता सामान्यांच्या भुवया उंचावून गेल्या. सर्वप्रथम उत्पादन घटण्याच्या भीतीने साखरेच्या दरात वाढ होत असल्याची माहिती समोर आली. दरम्यान ईव्ही बाजारपेठेतून आलेली दरमहा दोन लाखांहून अधिक 'ईव्हीं'ची नोंदणी होत असल्याची अर्थवार्ता दखलपात्र ठरली. याच सुमारास बाजारात छोटू नावाने प्रसिद्ध असल्याच्या सिलिंडरच्या मागणीत ८० ते ९० टक्क्यांनी घट झाल्याचे स्पष्ट झाले.**






महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये काही अर्थवार्ता सामान्यांच्या भुवया उंचावून गेल्या. सर्वप्रथम उत्पादन घटण्याच्या भीतीने साखरेच्या दरात वाढ होत असल्याची माहिती समोर आली. दरम्यान ईव्ही बाजारपेठेतून आलेली दरमहा दोन लाखांहून अधिक 'ईव्हीं'ची नोंदणी होत असल्याची अर्थवार्ता दखलपात्र ठरली. याच सुमारास बाजारात छोटू नावाने प्रसिद्ध असल्याच्या सिलिंडरच्या मागणीत ८० ते ९० टक्क्यांनी घट झाल्याचे स्पष्ट झाले.

'अल निनो'चा प्रभाव आणि कमकुवत मान्सूनमुळे खरीप हंगामातील पेरणीवर परिणाम झाला असून, जागतिक स्तरावर पुरवठा घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे साखरेच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. देशांतर्गत बाजारात दर नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने यापूर्वीच साखर निर्यातीवर निर्बंध कायम ठेवले आहेत. मॉन्सून उशिरा दाखल होणे आणि पावसाची कमतरता यामुळे ऊस लागवडीखालील क्षेत्र कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी, यंदाच्या हंगामात साखर उत्पादन घटण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. उत्पादन कमी होण्याच्या शक्यतेमुळे देशांतर्गत बाजारात साखरेच्या दरांनी वाढीचा कल दाखवला आहे.

गेल्या महिनाभरात घाऊक बाजारात साखरेच्या किमतींमध्ये तीन टक्क्यांहून अधिक वाढ झाली असून किरकोळ बाजारात ही वाढ आठ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. जागतिक बाजारातही गेल्या आठवडाभरात साखरेच्या किमतींमध्ये सुमारे सात टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. दिल्ली, मुंबईसह देशातील प्रमुख शहरांमध्ये महिनाभरापूर्वी प्रति किलो ४६ रुपये असलेली साखर आता ५० रुपयांच्या जवळपास पोहोचली आहे. घाऊक बाजारात एम-३० दर्जाच्या साखरेचे दरही वाढले आहेत. भारताबरोबरच ब्राझीलमध्येही कमी पाऊस आणि उसाच्या कापणीत झालेला विलंब यामुळे जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. उत्पादन आणि पुरवठा कमी होण्याच्या भीतीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेच्या किमतींमध्ये वेगाने वाढ झाली असून गेल्या आठवड्यातच सुमारे सात टक्क्यांची वाढ झाली आहे. साखरेचे दर दीड महिन्यातील उच्चांकावर पोहोचले असून आंतरराष्ट्रीय बाजारात ते प्रति पाउंड १५ डॉलरच्या पुढे गेले आहेत. देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता कायम रहावी आणि किमती नियंत्रणात रहाव्यात, यासाठी केंद्र सरकारने साखर निर्यातीवरील निर्बंध ३० सप्टेंबरपर्यंत वाढवले आहेत. तसेच देशांतर्गत विक्रीसाठी साखरेचा मासिक कोटाही मर्यादित ठेवण्यात आला आहे. अन्न मंत्रालयाने जुलै महिन्यासाठी २२ लाख टन साखरेचा देशांतर्गत विक्री कोटा निश्चित केला आहे. तो मागील वर्षाच्या जुलैइतकाच आहे. २०२५-२६ या साखर हंगामात (ऑक्टोबर ते सप्टेंबर) आतापर्यंत एकूण २२३ लाख टनांचा कोटा मंजूर करण्यात आला असून, तो मागील वर्षाच्या २२९.५ लाख टनांच्या तुलनेत तीन टक्के कमी आहे.

दरम्यान, 'स्टेट बँक रिसर्च'च्या अहवालानुसार, गेल्या काही महिन्यांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या (ईव्ही) मागणीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. 'ईव्ही'चा वाढता वेग कायम ठेवण्यासाठी चार्जिंग केंद्रांचे जाळे आणि पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र झाल्यानंतर इलेक्ट्रिक वाहनांच्या नोंदणीमध्ये मोठी वाढ झाली आहे. २०२५ मध्ये दरमहा सरासरी १.३ लाख ईव्हींची नोंदणी होत होती; मात्र मार्च ते जून २०२६ या कालावधीमध्ये हा आकडा वाढून दरमहा २.३ लाखांवर पोहोचला आहे. हीच वाढ कायम राहिल्यास २०२६ च्या अखेरीस देशातील इलेक्ट्रिक वाहनांची एकूण नोंदणी २५ लाखांहून अधिक होण्याची शक्यता अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. अहवालानुसार, २०२४ मध्ये नव्या वाहन नोंदणीमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वाटा दोन टक्क्यांपेक्षाही कमी होता; मात्र २०२६ मध्ये वाढून तो आठ टक्क्यांहून अधिक झाला आहे. काही राज्यांमध्ये तो दहा टक्क्यांच्याही पुढे गेला आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या स्वीकारात महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक ही राज्ये आघाडीवर असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

देशात सध्या सुमारे २९ हजार १५१ सार्वजनिक इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग केंद्रे कार्यरत आहेत. त्यापैकी केवळ तीस टक्के केंद्रांवर फास्ट चार्जिंगची सुविधा उपलब्ध आहे. देशातील सुमारे ३५ टक्के चार्जिंग केंद्रे कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये आहेत. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर अधिक वेगाने वाढवायचा असेल, तर 'फास्ट चार्जर'ची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवावी लागेल, असे अहवालात म्हटले आहे. दिल्ली सरकारने पुढील चार वर्षांमध्ये ३२ हजार नवीन चार्जिंग पॉइंट उभारण्याची योजना आखली आहे. अहवालानुसार, अनेक राज्यांमध्ये एका सार्वजनिक चार्जिंग केंद्रामागे २०० हून अधिक इलेक्ट्रिक वाहने आहेत. ओडिशा, बिहार, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये चार्जिंग सुविधांवर मोठा ताण आहे, तर कर्नाटक, हरियाणा, तेलंगणा आणि दिल्लीमध्ये परिस्थिती तुलनेने चांगली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. पश्चिम आशियातील युद्धामुळे केवळ कच्च्या तेलाच्याच किमती वाढल्या नाहीत, तर एलपीजीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. परिणामी 'अप्पू', 'छोटू' आणि 'मुन्ना' या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या पाच किलोच्या पोर्टेबल एलपीजी सिलिंडरच्या मागणीत मोठी घट झाली आहे. दर दुप्पट झाल्यानंतर या सिलिंडरची मागणी ८० ते ९० टक्क्यांपर्यंत घसरल्याची माहिती देशातील एलपीजी वितरकांनी दिली आहे. मुख्यतः स्थलांतरित कामगार, विद्यार्थी आणि वारंवार स्थलांतर करणाऱ्या नागरिकांकडून वापरल्या जाणाऱ्या या सिलिंडरची खरेदी आधार कार्डद्वारे सहज करता येते; मात्र वाढलेल्या किमतींमुळे त्यांची मागणी घटल्याने शहरांमध्ये स्थलांतरित मजुरांच्या पुनरागमनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. युद्धकाळात इंधनटंचाईमुळे अनेक मजूर आपल्या गावी परतले होते. दिल्लीमध्ये 'फ्री ट्रेड एलपीजी' (एफटीएल) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाच किलोच्या सिलिंडरची किंमत मार्चमध्ये ३२३ रुपये होती. ती जूनमध्ये वाढून ८२१.५० रुपये झाली. 'इंडियन ऑइल'कडून 'छोटू' आणि 'मुन्ना', 'भारत पेट्रोलियम'कडून 'भारतगॅस मिनी' तर 'हिंदुस्तान पेट्रोलियम'कडून 'एचपी गॅस अप्पू' या ब्रँड नावांनी हे सिलिंडर विकले जातात.

युद्ध सुरू झाल्यानंतर सुरुवातीला 'एफटीएल' सिलिंडरची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली होती; मात्र मे महिन्यानंतर ग्राहकांनी सिलिंडर रिफिलसाठी येणे जवळपास बंद केले आहे. देशभरात या सिलिंडरच्या मागणीमध्ये सरासरी ८० टक्क्यांची घट झाली असून काही ठिकाणी ही घसरण ९० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. 'एफटीएल' सिलिंडर हे दोन किलो आणि पाच किलो क्षमतेमध्ये उपलब्ध असलेले पोर्टेबल स्वयंपाक गॅस सिलिंडर आहेत. ते खरेदी करण्यासाठी केवळ आधार पडताळणी आवश्यक असते. हे सिलिंडर व्यावसायिक एलपीजीच्या श्रेणीत येत असल्याने त्यावर कोणतेही अनुदान दिले जात नाही. एलपीजी वितरक रंजीत सिंह यांनी सांगितले, की गेल्या काही आठवड्यांमध्ये नव्या सिलिंडरची विक्री तसेच रिफिलची मागणी घटली आहे. त्यांच्या वितरक केंद्रात विक्रीत सुमारे ४० टक्क्यांची घट झाली आहे. २३ मार्च ते २२ एप्रिल या कालावधीमध्ये देशभरात पाच किलोचे सुमारे २० लाख एफटीएल सिलिंडर विकले गेले होते. देशात सध्या ३४ कोटी घरगुती एलपीजी ग्राहक आहेत. जागतिक पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्यानंतर सरकारने २३ मार्चपासून स्थलांतरित कामगारांसाठी 'एफटीएल' सिलिंडर विक्रीस परवानगी दिली होती.

चर्चा आजची

# आश्वासनांचे पाऊस

प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्याला कायमच अतिवृष्टीचा फटका बसत आला आहे. वादळी वाऱ्यामुळे शेकडो घरांची पडझड झाली आहे. मागील वर्षी जूलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत जिल्ह्यातील ३७६ घरांची पडझड झाली. काही पुर्णतः तर काही अंशतः घरे कोसळली. उभारलेला संसार वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसात कोलमडला. मात्र अद्याप नुकसानग्रस्तांना शासनाकडून मदतीचा हात मिळाला नाही.एक वर्षे उलटूनही भरपाई मिळाली नाही. त्यामुळे प्रशासनाकडून आश्वासनाचे पाऊस कायमच असल्याचे चित्र आहे. रायगड जिल्ह्यामध्ये जूलै २०२५ मध्ये अतिवृष्टी झाली. अनेक भागात पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. सखल भागांमध्ये पाणी साचले होते. वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामध्ये काहींच्या घरांचे पत्रे उडाले. काहींच्या घरांची भिंत कोसळली. तर काहींचे पुर्णतः घर कोलमडून पडले. या पावसात मोठी वित्तहानी झाली. अतिवृष्टीमध्ये रायगड जिल्ह्यातील अनेक घरांची पडझड झाली. कच्च्याघरांसह पक्क्या घरांचीदेखील मोठी हानी झाली. जूलै २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये ३७६ घरांचे नुकसान झाले. त्यात ३३३ पक्के आणि ४३ कच्च्या घरांची पडझड झाली. पक्क्या घरांमध्ये २४ घरांची ५० टक्के, १५० घरांची २५ टक्के, १५९ घरांची १५ टक्के हानी झाली आहे. कच्च्या घरांमध्ये चार घरांचे ५० टक्के, आठ घरांचे २५ टक्के आणि ३१ घरांचे १५ टक्के नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली आहे. मागील वर्षी जून महिन्यातदेखील मूसळधार पावसामध्ये २४८ घरांची पडझड होऊन नुकसान झाले. २२६ पक्क्या घरांसह २२ कच्च्या घरांचा त्यामध्ये समावेश आहे. या दोन महिन्याच्या कालावधीत ६३४ घरांची मोठी हानी झाली होती. पोटाला चिमटा काढून निर्माण केलेला संसार या अतिवृष्टीत मोडून पडला. रायगड जिल्ह्यामधील श्रीवर्धन, कर्जत, पेण, पनवेल, म्हसळा या तालुक्यांतील ३८ पासून ८६ घरांचे



तसेच खालापूर, रोहा, सुधागड, अलिबाग, मूरूड, माणगाव, तळा, महाड, पोलादपूर या तालुक्यातील दोन पासून २६ घरांचे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनकडून उपलब्ध झाली आहे. जिल्हा प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करून नुकसानीचा अहवाल राज्य शासनाला पाठविला. शासनाकडून ५५ लाख रुपयांच्या भरपाईची मागणी करण्यात आली. मात्र एक वर्ष होत आले आहे, तरीदेखील शासनाकडून भरपाई मिळाली नसल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. नुकसानीचा निधी शासनाकडून उपलब्ध झाला नसल्याचा फटका नुकसान ग्रस्तांना झाला आहे. भरपाई मिळावी, म्हणून तहसील कार्यालयात जाऊन नुकसानग्रस्तांनी चपला झिजविल्या आहेत. परंतु अजूनपर्यंत नुकसानग्रस्तांची झोळी रिकामीच आहे.

२०२५ मध्ये झालेल्या आपत्तीमधील भरपाई एक वर्ष होत आली, तरी मिळत नसल्याने शासनाचा आणि प्रशासनाचा स्मार्ट कारभार फक्त कागदावरच असल्याची चर्चा आहे.नुकसानग्रस्तांना मदतीचा हात देण्याचे आश्वासन कायमच अशा दुर्घटनांच्या कालावधीत प्रशासन व शासन देत असते. परंतु आश्वासनाचे पाऊस कायमच असल्याचे पुन्हा समोर आले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये यंदा जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने सुरुवात केली. त्यानंतर तालुक्यात पेरणीच्या कामाला सुरुवात केली. परंतू पाऊस सतत सुरु राहिला. अलिबागसह अनेक भागात पाऊस कोसळला. अलिबाग तालुक्यातील रामराज, रेवस, पोयनाड, रेवदंडा अशा अनेक भागात प्रचंड पाणी साचले. शेतंही पाण्याने तुडूंब भरून गेली. पेरणी केलेली रोपे पाण्याखाली गेली. अलिबाग तालुक्यात भाताचे ११ हजार ४२८ हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र आहे. ९०२ हेक्टर क्षेत्रावर भात रोपवाटिका तयार करण्यात आली होती. कृषी विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार, नदी-नाल्यालगतच्या सखल भागात पुराचे पाणी साचल्यामुळे सुमारे ३२० हेक्टर क्षेत्रावरील भात रोपवाटिका पाण्याखाली गेली आहे. भातांची रोपे पाण्यात कुजून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला.

अतिवृष्टीसह वादळी वाऱ्यामुळे फळबागांच्या झाडांच्या फांद्या तुटणे, झाडे उन्मळून पडणे अशा अनेक घटना घडल्या. त्याचा नारळ सुपारी उत्पादकांनीही मोठा फटका बसला. अलिबाग तालुक्यातील चौल परिसरातील नारळ, सुपारी उत्पादक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. नुकसानीचे प्रमाण निश्चित करण्यासाठी कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून पाहणी सुरू असून शेतकऱ्यांकडून माहिती संकलित करण्यात येत आहे.कृषी विभागाकडून नुकसानीची पहाणी करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. मंडळ अधिकाऱ्यांसह कृषी अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष क्षेत्र भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधण्याचे काम केले. त्यानंतर कृषी उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. परंतु अजूनपर्यत पंचनामे करण्याची कोणतीही हालचाल प्रशासनाकडून झाली नाही. मागील आठ दिवसापुर्वी झालेल्या पावसात शेतीचे नुकसान झाले. त्यानंतर सहा दिवसांपासून पाऊस गायब झाले आहे. या कालावधीत अजूनहगी पंचनामे करण्याची परवानगी तालुका स्तरावर प्रलंबित आहे. तहसीलदार शासनाच्या वेगवेगळ्या योजनांमध्ये मग्न आहेत. त्यामुळे त्यांनाही पंचनामे तातडीने करण्याची परवानगी देण्यास वेळ मिळत नाही. शेतकरी जगला पाहिजे, हे फक्त कागदावर राहणार का असा सवाल जनमानसातून उमटला जात आहे.

लोकसंसद

## एसआयआर मोहिमेतील सावळागोंधळ दूर करावा

प्रशासनामार्फत जागोजागी फलक लावून मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेबाबत जनजागृती करण्यात आली. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान अपेक्षित असलेला सावळागोंधळ टळू शकला नाही. अनेक नागरिकांच्या घरी बीएलओ पोहोचलेच नसल्याच्या तक्रारी आहेत. काहींना अनावश्यक नोटिसा मिळाल्या, तर काहींना आवश्यक माहितीच मिळाली नसल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष घरभेट न देता पडताळणी पूर्ण झाल्याचे दाखविल्याच्याही तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे मतदार यादीतील त्रुटी वाढण्याची आणि पात्र मतदार वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय, काही गृहनिर्माण संस्थांमध्ये बीएलओंना प्रवेश नाकारला जात असल्याच्याही तक्रारी आहेत. अशा प्रकारामुळे पुनरीक्षणाच्या कामात अडथळे निर्माण होत असून त्याचा परिणाम मतदार यादीच्या अचूकतेवर होऊ शकतो. त्यामुळे अशा प्रकरणांची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन संबंधित सोसायट्यांवर योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच प्रशासनाने प्राप्त तक्रारींची तातडीने चौकशी करून आवश्यक तेथे पुनर्पडताळणी करावी. तसेच नागरिकांना त्यांची मतदार माहिती तपासणे व आवश्यक दुरुस्ती करणे यासाठी अधिक सुलभ, पारदर्शक व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# अभिनेते रवींद्र महाजनी यांचा स्मृतिदिनी

मराठी चित्रपट सृष्टीतील आजवरचा सर्वात देखणा नायक, मराठीतील विनोद खन्ना अशी बिरुदावली लागलेला, सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील मराठी मुलींच्या स्वप्नातील राजकुमार, मराठीतील सुपरस्टार, जेष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी १४ जुलै २०२३ रोजी रवींद्र महाजनी यांच्या निधनाची बातमी आली आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या काळजाचा ठोका चुकला. तसे त्यांचे निधन वयाच्या ७७ व्या वर्षी झाले म्हणजे वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. निधनानंतर दोन दिवसांनी पुण्यातील एका सदनिकेत त्यांचा मृतदेह आढळला तेंव्हा सर्व जण हळहळले. त्यांचा अशा प्रकारे मृत्यू होणे हे जितका धक्कादायक आहे तितकेच ते मनाला चटका लावून



जाणारेही होते. ज्यांचे आयुष्य प्रेक्षकांच्या गराड्यात गेले त्यांना अशाप्रकारे एकाकी मरण यावे हा दैवाचा अजब खेळ म्हणावा लागेल. त्यांच्याच देवता चित्रपटातील मखेळ कुणाला दैवाचा कळला....फ हे गाणे या निमित्ताने सर्वांना आठवले अर्थात आयुष्यभर स्टारडम मिळवूनही अशाप्रकारे एकाकी शेवट झालेले रवींद्र महाजनी हे पहिले कलाकार नाहीत याआधी जेष्ठ अभिनेत्री ललिता पवार, दक्षिणेतील सिल्क स्मिता, हिंदी चित्रपटातील नायिका परवीन बाबी, बॉलिवूडची सुपरस्टार श्रीदेवी या कलाकारांचा शेवट देखील अशाच प्रकारे चार भिंतीच्या आत झाला. पैसा आणि प्रसिद्धीसाठी संपूर्ण आयुष्य वेचलेल्या या कलाकारांना उतार वयात पैसा आणि प्रसिद्धी खरंच कामी येतात का....? याचा प्रत्येक कलाकारांनी करायला हवा अर्थात हा विचार फक्त कलाकारांनीच नव्हे तर सर्वांनीच करायला हवा. स्टारडम, पैसा, प्रसिद्धी, सत्ता हे सगळं क्षणभंगुर आहे. खरंच मखेळ कुणाला दैवाचा कळलाफहेच अंतिम सत्य आहे.

रवींद्र महाजनी यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९४९ रोजी बेळगाव येथे झाला. लहानपणापासून त्यांना अभिनयाची आवड होती. शाळेच्या स्नेहसंमेलनात ते आपल्या अभिनयाची हौस भागवून घेत. शालेय जीवनातच ते नाटकात काम करू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रात करियर करण्यासाठी ते मुंबईत आले. मधुसूदन कालेलकर यांनी त्यांना जाणता अजाणता या नाटकात पहिली संधी दिली. या नाटकातील त्यांच्या अभिनयामुळे त्यांना झुंज चित्रपटात नायकाची भूमिका मिळाली. त्यांचा हा पहिलाच चित्रपट आणि त्यातील त्यांची भूमिका खूप गाजली आणि मराठी चित्रपट सृष्टीला नवा सुपरस्टार लाभला. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी अभिनय केलेले सर्वच चित्रपट गाजले. यात आराम हराम है!, लक्ष्मी, लक्ष्मीची पावले, देवता, गोंधळात गोंधळ, मुंबईचा फौजदार हे चित्रपट तर प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. आजही दूरदर्शनवर हे चित्रपट लागले तर प्रेक्षक आवडीने पाहिले. या चित्रपटातील गाणीही खूप गाजली. त्यांनी अनेक नाटकातही भूमिका केल्या, बेलभांडार अपराध मीच केला या नाटकातील भूमिका खूप गाजल्या. त्यांनी काही चित्रपट आणि नाटके देखील दिग्दर्शित केली. ९० च्या दशकात काही टीव्ही वरील मालिकेतही त्यांनी भूमिका केल्या. काही मालिका दिग्दर्शित केल्या. मधल्या काळात ब्रेक घेऊन त्यांनी काय राव तुम्ही, कॅरी ऑन मराठा, देऊळ बंद, पानिपत या चित्रपटात चरित्र नायकाच्या भूमिका केल्या. त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले. त्यांच्या निधनाने मराठी चित्रपट सृष्टीने एक राजबिंडा नायक गमावला. रवींद्र महाजनी यांना भावपूर्ण आदरांजली!

**- श्याम ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१४ जुलै

१) श्री. अनिल नानू गुरव
अलिबाग, १४-७-१९५५


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## सिद्धांतचे यश

**खांदा कॉलनी :** पनवेलमधील सिद्धांत संजय कांबळे या विद्यार्थ्याने स्कॉटलंडमधील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या क्वालिफाईड लॉयर्स असेसमेंट परीक्षेत यश संपादन केले. त्याने स्कॉटलंडचे पात्र सॉलिसिटर होण्याचा मान मिळवला आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकरी न्यायाच्या प्रतीक्षेत

## ● पंचनामे होतात... पण मदत कुठे? कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई ग्रामीणचे आदिती तटकरेंना निवेदन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकणातील शेतकरी यंदा निसर्गाच्या दुहेरी संकटाने अक्षरशः कोलमडून गेला आहे. सुरुवातीला कडक उन्हामुळे पेरणी केलेली पिके करपून गेली. हातचे पीक वाचवण्यासाठी कर्ज काढून, पुन्हा बियाणे, खते आणि मशागतीवर खर्च करून शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली. मात्र निसर्गाने पुन्हा एकदा निर्दयी तडाखा दिला. गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाणी साचून राहिल्याने दुबार पेरणीही पूर्णपणे नष्ट झाली. एका हंगामात दोनदा झालेल्या या प्रचंड नुकसानीने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले असून त्यांच्या कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न उभा



राहिला आहे.

या परिस्थितीची शासनाने तातडीने दखल घ्यावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा आणि विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, या मागणीसाठी कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई ग्रामीण यांच्या वतीने राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा. ना. आदिती तटकरे यांची भेट घेऊन अध्यक्ष विजय बक्कम आणि मार्गदर्शक शंकर उभारे यांनी मंडळाच्या वतीने निवेदन सादर केले.

निवेदनात शेतकऱ्यांच्या भावना मांडताना स्पष्ट करण्यात आले की, दरवर्षी पंचनामे होतात; अधिकारी येतात, पाहणी करतात, कागदपत्रे तयार होतात; मात्र प्रत्यक्ष नुकसानभरपाई मिळतच नाही. शासनाच्या कठोर निकषांमध्ये अनेक नुकसानग्रस्त शेतकरी बसत नसल्याने त्यांना कोणतीही मदत मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

शेतकऱ्यांनी असा आरोप केला की, दोन वेळा झालेले नुकसान शासनाच्या नियमांमध्ये मोजले जात नाही. परिणामी, प्रत्यक्ष नुकसान सोसणाऱ्या अनेक कुटुंबांना मदतीपासून वंचित राहावे लागते. कर्जाचा डोंगर वाढत आहे, शेतीचा खर्च वाढत आहे आणि हातात उत्पन्न काहीच नसल्याने अनेक शेतकरी हताश झाले आहेत.

शेतकऱ्यांनी सांगितले की, त्यांच्या बाजूने लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी शासनाकडे प्रभावीपणे आवाज उठवण्याचा पुरेसा प्रयत्न केला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अपेक्षित गांभीर्य मिळाले नाही.

### योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन

निवेदनाची गांभीर्याने दखल घेत ना. आदिती तटकरे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत संबंधित विभागाशी चर्चा करून तातडीने योग्य कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

आता तरी शासनाने संवेदनशील भूमिका घेऊन प्रत्यक्ष नुकसानीचा विचार करावा, नियमांमध्ये आवश्यक शिथिलता आणून प्रत्येक पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय्य नुकसानभरपाई द्यावी.



## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

रिटघर येथे १९८२-८३च्या दहावीच्या बॅचचा पाचवा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वयाची साठी ओलांडलेल्या मित्रांनी पुन्हा एकदा शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध अधिक दृढ केले. मेळाव्यास दिलीप पाटील, मोहन पाटील, रमेश म्हात्रे, संतोष विचारे, अनंत मांदाडकर, बाळकृष्ण माळी, राजेंद्र वारे, राजेंद्र करडे, रंजन नाक्ती, सूर्यकांत गोंधळी, नारायण नकाशे आणि दिलीप विचारे उपस्थित होते. 'मित्रांसाठी काय पण' या भावनेतून अनंत मांदाडकर यांनी सर्वांसाठी टी-शर्ट भेट दिले. मित्र परिवाराने गप्पा-गोष्टी, विनोद, संगीत, जलक्रीडा आणि स्नेहभोजनाचा आनंद लुटला. हायस्कूलमधील आठवणींनी परिसर भारावून गेला.

## चोरढे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील चोरढे येथे सोमजाई माता क्रीडा मंडळ, खरसई यांच्या वतीने संस्थापक तथा कामगारभूषण चंद्रकांत खोत यांच्या ७५व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. या उपक्रमांतर्गत दोन शाळांमधील एकूण १४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

हा कार्यक्रम शुक्रवारी (दि.१०) आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात राजिप शाळा, चोरढे येथे इयत्ता पहिली ते सातवीमधील ७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे



### ●सोमजाई माता क्रीडा मंडळाचा स्तुत्य उपक्रम

वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका भगत व शिक्षकवृंद यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर दिनाभाई मोरे संचलित महात्मा गांधी विद्यालय, चोरढे येथे झालेल्या कार्यक्रमात इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या ७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना चंद्रकांत खोत यांनी शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य तथा महात्मा गांधी विद्यालयाचे संचालक अनिल चोरढेकर यांनी केले.

## लाडकी बहीण अपात्र?

२ कोटी ४७ लाख महिला पात्र मानल्या गेल्या होत्या. मात्र, ई-केवायसी प्रक्रिया आणि इतर निकष लागू झाल्यानंतर लाभार्थी महिलांची संख्या घटून १ कोटी ६७ लाखांवर आल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

योजनेतील लाभार्थी संख्या कमी झाल्याने सरकारवर विरोधकांनी जोरदार टीका सुरू केली आहे. निवडणुकीपूर्वी महिलांना आर्थिक मदतीची हमी देऊन मते मिळवली आणि सत्तेत आल्यानंतर विविध अटी घालून लाखो महिलांना योजनेबाहेर केले जात असल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून करण्यात येत आहे. अनेक महिलांमध्येही याबाबत नाराजी व्यक्त होत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, योजनेतील लाभार्थी महिलांची संख्या घटल्याने राज्यात पुन्हा राजकीय वातावरण तापले असून, पात्र महिलांना न्याय मिळावा आणि अपात्र ठरविण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

## महसूल शिबिरात भाजपाचा 'सोलो शो'

होती की भाजपची, अशी कुजबुज उपस्थितांमध्ये सुरू होती. शासकीय अभियानाच्या मंचावर मित्रपक्षांचा सहभाग नसल्याने कार्यक्रम महायुतीचा, पण रंगमंच भाजपचाच अशी उपरोधिक प्रतिक्रिया राजकीय वर्तुळात उमटू लागली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राज्यभर हे अभियान राबविले जाणार असून, रायगड जिल्ह्यासाठी अभियान समितीच्या सदस्यपदी भाजपचे आमदार प्रमोद जठार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१३) झालेल्या बैठकीत अभियानाच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

शासकीय अभियानाचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व घटक पक्षांचा सहभाग अपेक्षित असताना, बैठकीत मित्रपक्षांची अनुपस्थिती अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरली. महायुतीतील समन्वयाचा अभाव आहे की निमंत्रण प्रक्रियेत त्रुटी राहिल्या, याबाबत राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शासकीय दालनात आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेत केवळ भाजपच्याच नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची फौज होती. महाराजस्व अभियनाची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी जावळे यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. मात्र या अभियानाची माहिती आ. जठार यांनी दिली. यासंदर्भात आमदार प्रमोद जठार यांनी, बैठक घाईगडबडीत आयोजित करण्यात आल्याने सर्वांना निमंत्रित करता आले नाही, असे स्पष्टीकरण दिले. मात्र, या स्पष्टीकरणानंतरही अभियानाच्या प्रारंभालाच महायुतीतील अंतर्गत संवाद आणि समन्वयाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

## विहिरीत बुडून तरुणाचा मृत्यू

नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. मात्र, विहिरीची खोली अधिक असल्याने आणि पाणी गढूळ असल्याने शोधकार्य करण्यात अडचणी येत होत्या. यानंतर पाली पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला.

विहिरीतील पाण्याचा मोठा साठा आणि कमी दृश्यमानता लक्षात घेता कोलाड येथील विशेष रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. रेस्क्यू पथकाने युद्धपातळीवर शोधमोहीम राबवत अनेक तास प्रयत्न केल्यानंतर विघ्नेशचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.

या घटनेमुळे तेलंगे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अवघ्या २१ व्या वर्षी विघ्नेशचा झालेला मृत्यू गावकऱ्यांसाठीही मोठा धक्का मानला जात आहे. नातेवाईक आणि मित्रपरिवाराने घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू होते.

पान १ वरुन

दरम्यान, या प्रकरणाची नोंद पाली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेची सर्व परिस्थिती तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे रामवाडी गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांकडून विघ्नेश तेलंगे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## पंढरीच्या वाटेवर रक्ताचा सडा

ताब्यात घेतले असून, नेमका अपघात कसा घडला, याचा तपास सुरू आहे.

या घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घटनास्थळ आणि रुग्णालयाला भेट देऊन जखमी वारकऱ्यांची विचारपूस केली. जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत, तसेच मृतांच्या कुटुंबियांना आवश्यक ती मदत तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

## करंजाडे स्मशानभूमीत अंधाराचे साम्राज्य

अंधारामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

सीआयडीसीओच्या वेगाने विकसित होत असलेल्या करंजाडे परिसरात स्मशानभूमीसारख्या अत्यावश्यक ठिकाणीही मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याबद्दल नागरिकांनी तीव्र खंत व्यक्त केली. कायमस्वरूपी वीज जोडणी, उच्च क्षमतेचे दिवे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे करंजाडे शाखाप्रमुख गणेश उत्तेकर म्हणाले, स्मशानभूमी हे प्रत्येकाच्या आयुष्यातील अपरिहार्य वास्तव आहे. अशा ठिकाणी अंधारात अंत्यसंस्कार करण्याची वेळ येणे अत्यंत दुर्दैवी आहे. ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाने तातडीने वीज जोडणी, उच्च क्षमतेचे दिवे व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. भविष्यात कोणत्याही कुटुंबावर अशी वेळ येऊ नये, यासाठी त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे.

या गंभीर समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी प्रकाशयोजना व आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## विकास कागदावर, बाळंतपण डोलीतून!

उंबरणे-वरोसे ही आदिवासी वाडी आजही सर्व ऋतूंमध्ये वापरता येईल अशा रस्त्यापासून वंचित आहे. पावसाळा सुरू झाला की गावाचा संपर्क तुटतो. रुग्ण, गर्भवती महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना जीव धोक्यात घालून पायपीट करावी लागते. शनिवारी सकाळी मनीषा पारधी यांना प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर ग्रामस्थांनी चादरीची डोली तयार केली आणि सात किलोमीटरचा कठीण डोंगर-दऱ्यांचा प्रवास करत त्यांना चौक ग्रामीण रुग्णालयात आणले.

सकाळी सुमारे १० वाजता रुग्णालयात दाखल झालेल्या मनीषा पारधी यांनी सकाळी ११.१५ वाजता नैसर्गिक प्रसूतीद्वारे मुलाला जन्म दिला. डॉक्टरांच्या योग्य उपचारांमुळे आई आणि बाळ दोघांची प्रकृती उत्तम असून, त्यांच्यावर वैद्यकीय देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.दरम्यान, या घटनेची माहिती समाजमाध्यमांवर वेगाने पसरल्यानंतर प्रशासन आणि आरोग्य यंत्रणेचेही लक्ष या प्रकरणाकडे वेधले गेले. रुग्णालय प्रशासनाने आई आणि बाळाची विशेष काळजी घेतली आहे.

**माझा जन्मही अशाच परिस्थितीत झाला होता. माझ्या जन्मानंतर माझी आई आजारी पडली आणि तिला डोलीतून दवाखान्यात नेत असताना वाटेतच तिचा मृत्यू झाला. आजही आमच्या वाडीत परिस्थिती बदललेली नाही. आजारपण आले की डोलीच आमची रुग्णवाहिका असते.**

**– अनंत पारधी, बाळाचे वडील**

### लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

**ग्रामस्थांनी अनेक वर्षांपासून रस्ता, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांची मागणी केली आहे. मात्र, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून आश्वासनांशिवाय काहीच मिळाले नसल्याने आदिवासी बांधवांमध्ये तीव्र नाराजी आहे. स्वातंत्र्यानंतर सात दशकांहून अधिक काळ उलटूनही डोलीतून रुग्णांना दवाखान्यात नेण्याची वेळ येत असल्याने विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**

## सुनेत्रा पवारांना राष्ट्रवादीतूनच विरोध?

अजित पवार यांचे एका विमान अपघातात अकाली निधन झाले होते. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी पक्षाची विखुरलेली घडी बसवण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यांनी महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारीही स्वीकारली. त्यानंतर पक्षाच्या एका रितसर बैठकीत सर्वानुमते त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. सध्या पक्षात अजित पवारांचे ज्येष्ठ पुत्र पार्थ पवार आणि धाकटे पुत्र जय पवार हे देखील सक्रिय भूमिका बजावत असून, पवार कुटुंबाचे पक्षात महत्त्वाचे स्थान आहे. असे असताना थेट अध्यक्षपदालाच आव्हान मिळाल्याने चर्चांना उधाण आले आहे.

या कायदेशीर वादामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत धुसफूस आता चव्हाट्यावर आली आहे. काही दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि खासदार सुनील तटकरे यांच्या पदांचा उल्लेख नसल्याने राजकीय चर्चांना उधाण आले होते. पक्षात प्रफुल्ल पटेल-सुनील तटकरे विरुद्ध इतर गट असा छुपा संघर्ष सुरू असल्याच्या वावड्या उठल्या होत्या. यावर खासदार सुनील तटकरे यांनी बैठकीत जाहीर खंतही व्यक्त केली होती, ज्यानंतर सुनेत्रा पवारांनी स्वतः बैठक घेऊन सर्वांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, हा वाद शमला नसून तो आता थेट कायदेशीर लढाईपर्यंत पोहोचल्याचे दिसत आहे.

सच्चिदानंद सिंह यांनी नेमक्या कोणत्या तांत्रिक किंवा कायदेशीर त्रुटींच्या आधारे हा दावा केला आहे, हे अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही. मात्र, सुनेत्रा पवार जेव्हा पूर्ण ताकदीने पक्ष वाढीसाठी सक्रिय झाल्या आहेत, अशा वेळी अचानक आलेल्या या नोटीसमुळे राजकीय वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

## घरोघरी पडताळणी कागदावरच?

जमा करायची असतील, तर घराघरांत पडताळणीसाठी बी.एल.ओ. यंत्रणा उभारण्याचा उद्देशच काय? निवडणूक आयोगाने मोठ्या खर्चाने सुरू केलेल्या मोहिमेचे रूपांतर केवळ कागदपत्र स्वीकार केंद्रात होत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.दरम्यान, अनेक गावांमध्ये ध्वनिक्षेपकाद्वारे जनजागृती नाही, माहितीपत्रके वाटण्यात आलेली नाहीत, सार्वजनिक ठिकाणी सूचना फलक नाहीत आणि घरभेटींचाही अभाव असल्याने जनजागृतीची जबाबदारी नेमकी कोण पार पाडत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, तहसील प्रशासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून मोहिमेची अंमलबजावणी तपासावी, बी.एल.ओ. यांच्या कामकाजाचा आढावा घ्यावा आणि प्रत्येक घरापर्यंत एस.आय.आर. मोहिमेची माहिती पोहोचेल यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

मतदार यादीतील एकही पात्र मतदार वंचित राहू नये, हा निवडणूक आयोगाचा उद्देश असेल, तर रेवदंड्यातील सद्यःस्थितीची तातडीने दखल घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. अन्यथा, प्रशासन घराघरांत पोहोचले असे कागदोपत्री दाखवले जाईल आणि प्रत्यक्षात हजारो मतदार माहितीअभावी प्रक्रियेपासून दूर राहतील, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## माथेरानमध्ये पर्यटकांचा टेम्पो कलंडला

निर्णय घेतला. याच दरम्यान, एमएच-०५-एफजे-७४१४ क्रमांकाच्या मालवाहू टेम्पोमधून सुमारे १७ ते १८ पर्यटक नेरळकडे निघाले. जुम्मापट्टी परिसरात घाट उतरत असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो रस्त्याच्या कडेला कलंडला. अपघातात सात पर्यटक जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच नेरळ टॅक्सी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. जखमींना वाहनातून बाहेर काढून डॉ. सरोदे यांच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

दरम्यान, मालवाहू वाहनातून प्रवाशांची वाहतूक करण्यात आल्याप्रकरणी नेरळ पोलिसांनी टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मात्र, टेम्पोमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांपैकी अद्याप कोणाचाही अधिकृत जबाब नोंदविण्यात आलेला नसल्याने तपासात काही अडचणी येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. उपचारानंतर सर्व सात जखमींना सोमवारी सकाळी घरी सोडण्यात आले असून, या अपघाताचा पुढील तपास नेरळ पोलीस करीत आहेत.

## खाकीचा वचक संपला?

कुटुंबियांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नेरे गावचे पोलीस पाटील चंद्रकांत नथुराम पोकळे (४२) हे १० जुलै रोजी रात्री सुमारे पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास नेरे गावच्या बसथांब्याजवळ उभे होते. त्यावेळी पूर्वी दाखल केलेल्या एका तक्रारीचा राग मनात धरून तीन मोटारसायकलींवरून आलेल्या तरुणांनी त्यांना घेरले.

यामध्ये अनिकेत अनंत पाठारे याने हातातील लोखंडी रॉडने पोकळे यांच्या कपाळावर व हातावर जोरदार वार करून गंभीर जखमी केले. त्यानंतर रोहन रोहिदास राऊत याने लोखंडी रॉडने त्यांच्या डोळ्याजवळ व पोटावर प्रहार केला. आदित्य अनिल पाठारे याने त्यांना ओढत त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन तोडली, तर मिहीर मनोहर पाठारे याने त्यांना जमिनीवर पाडले.

यानंतर ऋषिकेश अनिल पाठारे, सुधीर सीताराम पोकळे, साहिल शरद पोकळे आणि अनिल चिंधु पाठारे हे इको वाहनातून घटनास्थळी आले. या सर्वांनी संगनमत करून पोलीस पाटलाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यांच्या हातातील मोबाईल फोन जमिनीवर आपटून फोडण्यात आला. तसेच झटापटीदरम्यान त्यांच्या खिशातील सुमारे साडेपाच हजार रुपयेही खाली पडून नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या चंद्रकांत पोकळे यांच्यावर अलिबाग येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पाली पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, हल्ल्यातील काही आरोपींनीदेखील जांभूळपाडा दूरक्षेत्र पोलीस ठाण्यात पोलीस पाटील चंद्रकांत पोकळे यांनी शिवीगाळ केल्याची परस्पर तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे सुधागड तालुक्यात खळबळ उडाली असून, कायद्याचे रक्षण करणाऱ्या पोलीस पाटलालाच अशा प्रकारे लक्ष्य करण्यात आल्याने कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पोकळे यांच्या कुटुंबियांसह ग्रामस्थांकडून होत आहे.

# निवडक



## एनसीएमसी कार्ड नोंदणी शिबीर

**नवी मुंबई :** पामबीच ज्येष्ठ नागरिक सेवा समितीच्या वतीने शुक्रवारी (दि.१०) विरंगुळा केंद्रात सानपाडा येथील भारत ई-सेवा केंद्राच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डचे नोंदणी शिबीर पार पडले. उपमहापौर दशरथ भगत यांनी याप्रसंगी सांगितले की, उरलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी अशाच प्रकारचे शिबीर पुन्हा आयोजित केले जाईल. तेव्हा इतर ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. या शिबिरात १०६ ज्येष्ठ नागरिकांनी एनसीएमसी कार्डसाठी आपल्या नावाची नोंदणी करून, या योजनेचा लाभ घेतला. शिबीर आयोजन करण्यासाठी पामबीच ज्येष्ठ नागरिक सेवा समितीचे अध्यक्ष देवेंद्र खाडे, सचिव चंद्रकांत काळे, खजिनदार हेमंत देसाई, इतर पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळाने विशेष परिश्रम घेतले. एनसीएमसी कार्ड नोंदणीसाठी सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव, भारत ई-सेवा केंद्राच्या विजया विश्वासराव, दिपाली पाटील यांनी मदत केली.




## 'आशा की किरण फाउंडेशन'चे कौतुक

**पनवेल :** 'आशा की किरण फाउंडेशन' ही संस्था नशा मुक्ती क्षेत्रात सातत्यपूर्ण, शास्त्रोक्त आणि कायदेशीर चौकटीत राहून कार्य करत आहे. या व्यसनमुक्ती केंद्राला नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील डीसीपी, क्राईम ब्रांच व नार्कोटिक्स विभागाच्या अधिकारी वर्गाने भेट देत संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक केले. या भेटीदरम्यान अधिकाऱ्यांनी संस्थेतील वैद्यकीय उपचार पद्धती, रुग्णांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सुरक्षित व शिस्तबद्ध व्यवस्थापन, तसेच कायदेशीर नियमांचे काटेकोर पालन यांची पाहणी केली. रुग्णांशी संवाद साधून त्यांचे अनुभव जाणून घेतले तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी व्यसनमुक्ती अभियानाबाबत सविस्तर चर्चा केली. अनेक वर्षांपासून वैद्यकीय उपचारांसोबतच समुपदेशन, योग, सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध उपक्रम राबवून रुग्णांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक पुनर्बांधणीसाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. सण-उत्सव, प्रेरणादायी कार्यक्रम आणि सकारात्मक वातावरणाच्या माध्यमातून रुग्णांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य संस्थेकडून केले जाते. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी संस्थेचे प्रमुख बशीर कुरेशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे समाजाला निरोगी, सक्षम आणि जबाबदार नागरिक घडण्यास मोठी मदत होत असल्याचे मत व्यक्त केले. व्यसनमुक्ती ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून सामाजिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक अनिल गेनू उतेकर मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| २७ | ०-६८-८० | २-०५ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि.१४/०७/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय- कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर ९१६८८०१०४८

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक अनिकेत अनिल उतेकर मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे नाडसूर, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ३० | ०-६५-७० | ३-० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. १४/०७/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय -कळंब रोड कॉर्नर, जवळ हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका सुधागड, जिल्हा रायगड पिन - ४१०२०५
मोबाईल नंबर ९१६८८०१०४८

# निवडक



## नांदगाव परिसरात वृक्षारोपण

**पाली/गोमाशी :** सामाजिक बांधिलकी जपत निखिल कोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त प्राथमिक शाळा नांदगाव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत होणार आहे. तसेच शिवस्मारक परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रमही राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचाही संदेश देण्यात आला. वाढदिवस साजरा करण्याऐवजी समाजोपयोगी कार्य केल्याने ग्रामस्थांनी कोंडे यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी प्रदीप गोळे, सुधीर सावंत, मंगेश पालांडे, किरण पिंपळे, नंदू कुडापणे, राकेश साजेकर, मनोज शिंदे, कृष्णा पालांडे, शिवराम पवार, संतोष कोंडे, कल्पेश सावंत, राकेश भगत, अमोल मराठे आणि सागर कदम ,मुख्याध्यापक तांबे आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मॉर्निंग ग्रुपचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



## एचपीसीएलतर्फे 'स्वच्छता पखवाडा'

**पनवेल :** हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, चावणे येथे 'स्वच्छता पखवाडा' ही विशेष मोहीम अत्यंत उत्साहात राबविण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करणे आणि त्यांना चांगल्या सवयींची ओळख करून देणे हा होता. या मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा आणि पावसाळ्याचे दिवस लक्षात घेऊन उपयुक्त वस्तूंचे वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना पेन्सिल किट, छत्री, आणि स्केचपेन यांचे वाटप करण्यात आले. शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी क्ष्ऋउङ तर्फे शाळेला डस्टबिन, झाडू यांसारखे स्वच्छता साहित्य भेट देण्यात आले. या कार्यक्रमाला मरुला स्वामी, प्रवीण लबडे, मुख्याध्यापिका सुलभा तायडे व इतर शिक्षिका उपस्थित होत्या.

## गणना प्रपत्र भरण्याच्या प्रक्रियेला वेग



**चिरनेर :** उरण तालुक्यात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गणना प्रपत्र भरण्याची प्रक्रिया जोरात सुरू झाली आहे. संबंधित अधिकारी व कर्मचारी नागरिकांकडून आवश्यक माहिती संकलित करीत आहेत. या प्रक्रियेत नागरिकांनी अचूक आणि संपूर्ण माहिती देऊन आपले नाव मतदान यादीत पक्के करावे असे आवाहन उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम तसेच निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांनी केले आहे. मतदार यादीत आपले नाव पक्के करण्यासाठी एक पासपोर्ट फोटो, आधारकार्ड क्रमांक, मोबाईल नंबर, जन्मतारीख, आई-वडिलांचे पूर्ण नाव त्याचबरोबर त्यांच्या जुन्या ओळखपत्राचा क्रमांक लागणार आहे. तसेच कोणतीही माहिती लपवू नये किंवा चुकीची माहीती देऊ नये. यासाठी कर्मचाऱ्यांना सहकार्य करून, सर्वांनी निर्धारित कालावधीत गणना प्रपत्र भरून संबंधित केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडे २९ जुलैपर्यंत जमा करण्याचे आवाहन केले आहे.

## आघाडीचे नगरसेवक सोसायटीच्या दारी

**पनवेल :** महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी खांदा कॉलनी सेक्टर-१३ येथील अश्विनी सोसायटी, श्री स्वामी समर्थ सोसायटी आणि श्री स्वामी दर्शन सोसायटी येथे नगरसेवक सोसायटीच्या दारी या उपक्रमांतर्गत लोकप्रतिनिधींनी भेट देत नागरिकांच्या विविध समस्या व सूचनांची माहिती घेतली. यावेळी परिसरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते तसेच इतर नागरी सुविधांबाबत रहिवाशांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. या भेटीदरम्यान लतीफ शेख, केतन भगत, आर्या प्रवीण जाधव, मनीषा म्हात्रे, प्रवीण जाधव उपस्थित होते. तसेच तिन्ही सोसायट्यांचे पदाधिकारी आणि रहिवासी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- रॉयल मोटर विद्यानगर अलिबाग येथे १२०० sqft कार्पेट 2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. एजंट क्षमस्व- ९९७५४९०१६४
- नामांकित कंपनीला हाऊसकिपींग/घरकाम करण्यासाठी विनापाश किंवा अविवाहीत महिला पाहिजे व रोज ८ तास काम, सरकारी मान्यतेप्रमाणे पगार, PF आणि विमा तसेच राहणे व जेवण सहीत संपर्क- ७७७५८०२२३२
- सकाळी ८-९ या वेळात आणि ८.१५ ते १० या वेळेत घरकामासाठी दोन वेगवेगळ्या बायका पाहिजे आहेत. संपर्क - ९२८४५५५३१४
- EDII द्वारा उद्या प्रकल्प अंतर्गत उद्या महिला उद्योजिका असोशिएनद्वारा अलिबाग येथे 'उद्या बाजार' स्टोअर्स करीता अनुभवी रिटेल स्टोअर्स मॅनेजर (महिला) तसेच सेल्स गर्ल पाहिजेत संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक संपर्क - ७७७५८०२४९७ ईमेल- pasb-c@ediindia.org
- गिरीष एंटरप्रायजेस, अलिबाग आवश्यक पदे : ऑफिस कामासाठी १ मुलगी (किमान १२ वी उत्तीर्ण) साईटवरील कामासाठी २ हेल्पर मुले (शिक्षणाची अट नाही) टू-व्हिलर चालवता येणे आवश्यक स्थानिक उमेदवारांना प्राधान्य ऑफिस वेळ : सकाळी ९:०० ते सायंकाळी ६:०० इच्छुक उमेदवारांनी ८२३७३१६२१८ ह्या नंबर वर आपला रिझ्युम व्हाट्सअप करावा.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरानकरांचे आरोग्य धोक्यात

**• शार्लोट लेकमधून गढूळ पाण्याचा पुरवठा • साथीचे आजार बळावण्याची शक्यता**

| नेरळ | प्रतिनिधी |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ढिसाळ कारभारामुळे शहराला गढूळ आणि अनियमित पाणी पुरवठा होत असल्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. या पाण्यामुळे एकूण शहराचेच आरोग्य धोक्यात आले आहे. माथेरान शहरात सध्या शार्लोट लेकमधून पाणी पुरवठा केला जात आहे. लेकमधील पाणी गढूळ असल्याने तसेच पाणी शहरात सोडले जात असून गढूळ पाण्यामुळे साथीचे आजार बळावण्याची शक्यता आहे.



माथेरानमध्ये ब्रिटिश काळात शार्लोट लेक तलाव बांधण्यात आला. त्या तलावातून पाण्याचा पुरवठा शहरातील नागरिकांना होत होता. पुढे थंड हवेचे ठिकाण आणि पर्यटनस्थळ म्हणून विकसित झाल्याने माथेरानमध्ये येणारे पर्यटकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे माथेरानमधील नागरिकांना आणि हॉटेल व्यावसायिक, अन्य व्यावसायिकांना पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी उल्हास नदीवरून देखील पाण्याचा उपसा केला जातो. परंतु पावसाळ्यात उल्हास नदीवरून पाणी उपसा बंद ठेवला जातो.

शहरात असलेल्या शार्लोट लेकमधून पाणी उचलले जात असून माथेरान शहरात सध्या सुरू असलेल्या पावसामुळे शार्लोट लेकमधून नळावाटे येणारे पाणी हे दूषित आणि गढूळ येत आहे.

माथेरान शहराला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाण्याचा पुरवठा करीत असून शहरात पावसाळा असल्याने शार्लोट लेकमधील पाणी पूर्णपणे गढूळ आहे. तेच पाणी स्थानिकांना नळावाटे दिले जात असल्याने माथेरानमध्ये साथीचे आजार बळावण्याची चिन्हे आहेत.

शार्लोट लेकमधून संपूर्ण पावसाळ्यात पाणी उचलून त्या प्राण्यावर जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून पुढे वितरित केले जात असल्याचे प्राधिकरणाचे म्हणणे आहे. मात्र, शहरात नळाद्वारे येणारे पाणी हे अशुद्ध आणि दूषित तसेच गढूळ असल्याचे दिसून येत आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पारटे यांनी अभ्यासपूर्ण विवेचना करीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नळाद्वारे देणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करीत नसल्याचा आरोप केला आहे. जलशुद्धीकरण केंद्रांवर पाणी न पोहचता ते थेट वितरित केले जात असल्याचा आरोप केला आहे. माथेरान सारख्या महत्वाच्या पर्यटनस्थळी नळपाणी योजना चालवणाऱ्या जीवन प्राधिकरणाचे अधिकारी हे केवळ पाणी पट्टी वसूल करण्यासाठी येत असल्याचा आरोप केला आहे. सहायक अभियंता आणि शाखा अभियंता पुर्णवेळ कधीही माथेरानमध्ये दिसून येत नाहीत. खासगी ठेकेदाराकडे पाणी शुद्धीकरण केंद्राचा कारभार देण्यात आल्याने जंतुनाशक न टाकताच पाणी सोडले जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यानंतर माथेरान नगरपरिषदकडून पाण्याची तपासणी प्रयोगशाळेत केली असता ८० टक्के पाणी दूषित असल्याचे सिद्ध झाले आहे.

> महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ठेकेदाराला पोसण्याचे काम करीत आहे. प्राधिकरणाचा ढिसाळ कारभार यामुळे माथेरानमधील जनतेचे आरोग्य बिघडण्याची चिन्हे आहेत. गढूळ आणि दूषित पाण्यामुळे आजार बनवण्याची चिन्हे असून नगरपरिषदेने प्राधिकरणाच्या कारभारावर जिल्हाधिकाऱ्यांना कळवले पाहिजे.
>
> -जनार्दन पारटे
> सामाजिक कार्यकर्ते

## पनवेलच्या सुशोभीकरणाला पार्किंगचा 'ग्रहण'

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

आषाढी एकादशीच्यानिमित्ताने लाखो वारकरी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या वारीत सहभागी झाले असताना पनवेल शहरातील वीर सावरकर चौकासमोरील संत तुकाराम महाराज व पांडुरंग यांचे आकर्षक भित्तीचित्र मात्र, वाहनांच्या पार्किंगमुळे झाकोळले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.



पनवेल महानगरपालिकेने शहर सुशोभीकरणाच्या उद्देशाने विविध चौक, रस्ते आणि भिंतींवर ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक विषयांवरील सुंदर चित्रे साकारली आहेत. मात्र, संबंधित भिंतींसमोर मोठ्या प्रमाणावर चारचाकी व दुचाकी वाहने उभी राहत असल्याने या कलाकृतींचे सौंदर्य नागरिकांना पाहता येत नाही.

विशेषतः संत तुकाराम महाराज आणि विठ्ठलाचे चित्र आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर भक्तांचे लक्ष वेधून घेणारे असतानाही पार्किंगमुळे त्याचा भाव आणि संदेश हरवत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

शहरातील अनेक भित्तीचित्रांचीही हीच अवस्था असून, पार्किंगच्या अनियोजनामुळे सुशोभीकरणावर खर्च झालेला निधी व कलाकारांची मेहनत वाया जात असल्याची टीका होत आहे.

## विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप

**पाताळगंगा :** रायगडचे खा. सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त खालापूर तालुक्यातील नडोदे, डोणवत, तांबाटी, किरखंडी आणि डोणवत ठाकूरवाडी येथील राजिप शाळांमधील विद्यार्थ्यांना १,२०० छत्र्यांचे वाटप करण्यात आले. सुधाकर घारे व संतोष बैलमारे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास समाधान बैलमारे, सागर घोसाळकर, ज्ञानेश्वर सुतार, जगदीश मराजगे, नंदकुमार पाटील, नागेश मेहत्तर, अल्पेश चौधरी, सह अन्य पदाधिकारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीबीएससी शिष्यवृत्ती ज्ञानदा जिल्ह्यात द्वितीय

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील जे. एम. राठी इंग्लिश स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज रोठ येथे ज्ञानदा उस्तुरे शिक्षण घेत आहे. या विद्यार्थिनीने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेतर्फे इयत्ता पाचवी सीबीएससी माध्यमातून शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादित करून रायगड जिल्ह्यात द्वितीय क्रमांक व रोहा तालुक्यात प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान पटकावला आहे. ज्ञानदाने सीबीएससीशिष्यवृत्ती परीक्षेसोबतच नवोदय पात्रता परीक्षा ८८.७५ टक्के गुण संपादन केलेले आहे. तसेच मंथन जनरल नॉलेज स्पर्धा परीक्षा २०२६ यामध्येही केंद्र स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला शिवाय इंग्लिश ऑलंपियाड व सायन्स ऑलंपियाड या दोन्हीही स्पर्धात्मक परीक्षांमध्ये सुवर्णपदक मिळवत सर्वच स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश संपादित करून नेत्रदीपक कामगिरी केली आहे. तिच्या नेत्रदीपक कामगिरीबद्दल तिचे सर्वच स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत असून पुढील उज्वल शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## वाहतूक पोलिसांकडून अपघातग्रस्तांवर उपचार

**नवीन पनवेल :** शिवशंभो नाका ते पळस्पे मार्गावरील मुख्य रस्त्यावर, १२ जुलै रोजी कोस्ट गार्ड बिल्डिंगसमोरील नांदगाव कट येथे दोन दुचाकींचा अपघात झाला. याबाबतची माहिती शिवशंभो सिग्नल येथे वाहतूक नियमन करत असलेले बीट मार्शलवरील अमीर मुलाणी व सुरेश जौंजाळ यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली.

अपघातात रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेल्या दोन महिला व एका पुरुषाला मुलाणी, जौंजाळ व उपस्थित नागरिकांच्या मदतीने कोणताही विलंब न करता, ॲम्ब्युलन्सची वाट न पाहता खासगी ऑटो रिक्षांद्वारे उपचारासाठी तात्काळ पनवेल ग्रामीण रुग्णालयात रवाना केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी दाखविलेली तत्परतेमुळे अपघातग्रस्तांना वेळेत उपचार मिळाले. त्यांच्या या कार्याचे नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

## आरोग्य शिबिराचे आयोजन

**पनवेल :** राजिप सदस्य विलास नारायण फडके यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १५ जुलै रोजी विविध लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विदेघर येथे भव्य आरोग्य शिबीर व मोफत औषध वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या आरोग्य शिबिरात वजन व्यवस्थापन, रक्तदाब, मधुमेह, तपासणी करण्यात येणार आहे.

## नव्याने डांबरीकरण केलेल्या रस्त्याला खड्डे

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

मुसळधार पावसाने काहीशी उसंत घेतल्यानंतर पनवेल शहरातील रस्त्यांची दुरवस्था पुन्हा एकदा समोर येऊ लागली आहे. शहरातील हिरवे गुरुजी चौक परिसरातील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडण्यास सुरुवात झाली असून, अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. नव्याने करण्यात आलेल्या डांबरीकरणानंतरही रस्ता इतक्या कमी कालावधीत उखडू लागल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



विशेषतः दुचाकीस्वारांना या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहने खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात वाहतूक विस्कळीत होत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पनवेल महानगरपालिकेने या रस्त्याची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत, तसेच निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## गारंबी,खारआंबोली धरणांवर पर्यटकांची चंगळ

| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

जंजिरा संस्थानाचा पुरोगामी विकास करणारे सिद्दी अहमदखान यांनी विक्टोरिया राणीच्या भारत भेटीची आठवण म्हणून गारंबीच्या जंगलातील धरणास विक्टोरिया ज्युबीली वॉटर वर्क्स हे नाव दिले. विपुल वनसंपत्ती नैसर्गिक पाणी अडवून बांधलेले हे धरण गारंबी धरण म्हणून प्रसिद्ध आहे.



सलग पडणाऱ्या पावसाने खरआंबोळी धरण भरून वाहू लागले. पर्यटक गेली दोन आठवडे धरण भरण्याची वाट पाहत होते. सातवतकडा धबधबा मोठ्या प्रमाणात वाहू लागला आहे. परंतु, तिकडे जाणे सोपे नसल्याने पर्यटक गारंबी व खरआंबोळी धरणावर पावसाचा आनंद घेण्यासाठी जातात. खारआंबिली धरणावर पर्यटकांनी मुख्य धरणात न जात खाली छोट्या धबधब्यात आनंद घ्यावा आणि अपघात टाळावे असे पोलिसांना आव्हान केले आहे.

पावसाळ्यात सर्व परिसर हिरवाईने नटलेला असतो. हल्ली पर्यटकांना पावसाळ्यात भिजण्याचा व पोहण्याचा आनंद घेण्यासाठी ठिकाण पाहिजे असते. जर गारंबी धरणाचा विकास झाला. नव्याने झालेले खरआंबोली धारणची पाणी पुरवठा क्षमता मोठी असल्याने मुरुड शहराला भविष्यत पाणी टंचाई भासणार नाही. खरआंबोली धरणाचे ओव्हरफ्लो पात्र ४०० फूट रुंद असल्याने दर पावसाळ्यात हजारो पर्यटक पोहण्याचा आनंद घेत असतात.

## अंजुम हायस्कूलमध्ये निवडणुकीचे आयोजन

| रोहा | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची जाणीव जागृत करण्यासाठी श्रीवर्धन अंजुमन उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये शालेय संसद निवडणुकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या निवडणूक प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला होता.

बारावी आर्ट्समधील विद्यार्थी अली दानिश लांबे याला जनरल सेक्रेटरीचे मानाचे पद पटकावले. तर दहावीमधील हुमैरा हाशमी कुमार या विद्यार्थिनीची पंतप्रधान म्हणून निवडून आली. मुआविया मुनव्वर अर्जबेगी याची उप पंतप्रधान, युनूस इम्रान ब्युनाक हा विद्यार्थी प्रतिनिधी, फिजा फैयाज दफेदार, आलिया देवकर अध्यक्ष, आयशा हाशमी कुमार उपाध्यक्ष, महक मुबशिर ठांगे क्रीडा मंत्रालय, रबी शाईब मल्लाक आरोग्य व स्वच्छता मंत्री, हफ्सा फैसल ब्रोड माहिती व प्रसारण मंत्री, वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम आयोजन समितीच्या सेक्रेटरीपदी बिलाल पटेल, फातिमा आलमगीर दफेदार पर्यटन मंत्री, हफ्सा अब्दुल वहाब वाडकर शिस्त मंत्री पदी निवड करण्यात आली.

**उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता | नुकसानाचे पंचनामा करून भरपाईची मागणी**

## पारखंदेत भातशेतीवर दगड-मातीचा थर

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

रायगड जिल्हाला मागील आठवड्यात मुसळधार पाऊस बसला. त्याचा फटका परखंदे येथील शेतकरी वर्गाला बसला. सततच्या पावसामुळे शेतामध्ये मोठ्या प्रमाणात चिखल, गाळ व माती साचली असून अनेक ठिकाणी जमीन व खडकाळ बनली आहे. त्यामुळे यंदाच्या भात लागवडीवर मोठे संकट ओढवले असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. झालेल्या नुकसानाचे तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना भरपाई मिळावी अशी मागणी करण्यात येते आहे.



भात लागवडीसाठी शेतात टाकण्यात आलेले राब पावसाच्या पाण्यासोबत वाहून आलेल्या मातीखाली पूर्णपणे गाडले गेले आहे. त्यामुळे लागवडीसाठी केलेली पूर्वतयारी वाया गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक शेतांमध्ये पाण्याचा निचरा होत नसल्याने शेतीचे काम ठप्प झाले आहे.

सततच्या पावसामुळे शेतातील सुपीक माती वाहून गेल्याने उत्पादन क्षमतेवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच वाढत्या शेती खर्चामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता अतिरिक्त खर्च करून पुन्हा लागवडीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित महसूल व कृषी विभागाने तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत आणि शासनाकडून योग्य आर्थिक नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी परखंदे गावातील शेतकऱ्यांनी केली आहे.

> आठ दिवसापूर्वी झालेल्या पावसाने अक्षरशः शेतकऱ्यांची दाणादाण उडून दिली आहे. पाण्याच्या प्रवाहाबरोबर माती दगड हे मोठ्या प्रमाणात आल्यामुळे भात लागवडसाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्याचबरोबर शेतात तयार होत असलेले राबावर सुद्धा याचा परिणाम झाला आहे.
>
> -हेमंत पाटील, शेतकरी परखंदे

वेळेत मदत मिळाल्यास पुढील शेतीची कामे सुरू ठेवणे शक्य होईल, अन्यथा यंदाचा खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

> परखंडे गावामध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याची सदर तक्रार आमच्याकडे आले असून त्या अनुषंगाने आम्ही सोमवारी जाऊन पाहणी करण्यात येईल तसेच शेतकऱ्यांच्या झालेले शेतीचे नुकसान संदर्भात नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रयत्न केले जाईल.
>
> -मुकेश शेट्टे
> कृषी सहाय्यक, खोपोली

# रिव्हर राफ्टिंग बुकिंग कार्यालयाचे उद्घाटन

**पोलादपूर :** लोहारे गावातील नरवीर ढाबाच्या प्रांगणात उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पात्रालगत नरवीर एडव्हेंचर्सच्या रिव्हर राफ्टिंग बुकिंग कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. रविवारी (दि.१२) सकाळी राजिपचे शिक्षण, अर्थ व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे यांच्या हस्ते हे उद्घाटन पार पडले. यावेळी रामदास कळंबे, नारायण कळंबे, नंदू कळंबे, सुरेश पवार, विक्रम भिलारे, गणेश उतेकर तसेच नरवीर संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री ऋषिकेश अरुण गायकवाड व विद्या ऋषिकेश गायकवाड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे मौजे मोठे वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत १) सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ६७/१ क्षेत्र ०.२२.०० हे.आर. पॉ. आकार २.०८ रु. पै. (२) सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ६७/ क्षेत्र ० २१.०० हे. आर. पॉ. आकार ३.७७ रु. पै. (३) सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ७१ /१ क्षेत्र ०.१९.०० हे. आर. पॉ. आकार ३.४४ रु. पै. (४) सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ७२/८/ब क्षेत्र ० २०.०० हे. आर. पॉ. आकार ३.५६ रु.पै. (५) सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर ७३/४ क्षेत्र ०.२७.०० हे. आर. पॉ. आकार ४.६९ रु. पै. या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १४/०७/२०२६

**वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
पत्ता दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने असे कळविण्यात येते की, मौजे वळवली, पो. मल्याण ता अलिबाग जि. रायगड येथील गट नं २८/१ क्षेत्र ०.२८.८० आकार १.८७ रू. पै. व गट नं २७/२ क्षेत्र ०.११.४० आकार १.०६ रू. पै व गट नं २७/३ क्षेत्र ०.२२.६० आकार ०.६७ रू. पै अशी मिळकत आमचे अशिल शिवराम पांडुरंग लोहार रा. वळवली पो. मल्याण ता. अलिबाग जि. रायगड यांची वडीलोपर्जित एकत्रित मालकीची एकत्र कसवणूकीची अशी मिळकत आहे. परंतु ७/१२ सदरी विजय नारायण सुतार उर्फ लोहार दिनेश नारायण सुतार उर्फ लोहार, संतोष नारायण सुतार उर्फ लोहार अशी नावे ७/१२ सदरी असल्याचा गैरफायदा घेवून सदर व्यक्ती सदर मिळकत अन्य त्रयस्थ इसमांस विक्री करू पाहतात किंवा हस्तांतरीत करू पाहत आहेत.

सदर व्यक्तीबरोबर कोणीही कसल्याही प्रकारची बोलणी करू नये तसेच साठेकरार, कुळअखत्यारपत्र, खरेदीखत, बक्षीसपत्र भाडेपट्टा इ. कोणत्याही प्रकारचा व्यवहार किंवा करार करू नये. सदर मिळकत आमचे अशिलांची वडीलोपार्जित मिळकत असून त्यात आमचे अशिलांचा अविभाज्य हिस्सा आहे.

सदर मिळकती बाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा करार करू नये. सदर मिळकती बाबत अलिबाग येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं ८१/२०२६ असा दावा ठरावाकरीता, वाटपाकरीता, निरंतरचे मनाई हुकूमाकरीता, ताब्याकरीता व इतर तदनुषंगीक मागण्याकरीता दावा दाखल केलेला आहे. सदर दावा प्रलंबित आहे. तसेच प्रांत सो अलिबाग यांचे कडील अपील दाखल केलेले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार वा हस्तांतरण करू नये तरी सुद्धा कोणी असा व्यवहार करणाऱ्या व्यक्तीबरोबर दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कार्यवाही करतील, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक १३/०७/२०२६

सही/-
**(ॲड.जी.जी.गोंधळी)**
'गोंधळी निवास' जुम्मा मशिदी शेजारी
अंकुर ड्रायफ्रुट्सच्यासमोर, शेषनाथ
वाडेकर मार्ग, अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९९२२७१६७८७/८१४९९९७०७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| | ८२/२ | १-९२-०० | २=०३ |
| दिपक शांताराम देशमुख | ८४/२/अ | ०-२१-०० | ०=२० |
| किरण शांताराम देशमुख | ९०/८ | ०-२७-०० | ०=१२ |
| ज्योति दिपक हालपतराव | ९०/९ | ०-२८-०० | ०=१२ |
| | ९०/११ | २-६३-०० | १=२६ |
| | ९०/१४ | ३-५४-०० | ०=१६ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक:- १४/०७/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| प्रवीण गिरधर ठाकूर | ७६ | ०-२७-३० | ०=५३ |
| | ७७/१ | १-२४-४० | ३=८० |
| | ७८ | ०-२०-२० | ०=२२ |
| | ७९ | २-२३-६० | १४=९४ |
| | ८३/१/अ/१ | ०-११-०० | ०=०५ |
| | ८३/१/२ | १-४६-०० | ०=९९ |
| | ८३/१/अ/३ | २-००-०० | १=३० |
| | ८३/१/अ/७ | १-६०-०० | ०=६८ |
| | ८३/२/ब | १-६२-०० | १=१२ |
| | ८५ | ०-२७-३० | ०=५६ |
| | ८६/१ | ०-१६-०० | ०=०९ |
| | ८७/१ | १-१०-३० | १३=३४ |
| | ८८/१ | १-१४-७० | ०=५३ |
| | ८९ | ०-१०-६० | ०=५३ |
| | ९०/१३ | १-७४-०० | ०=९१ |
| | ९०/१६ | ५-७३-०० | १=५७ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १४/०७/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| | ८०/४ | २-१९-०० | ०=३१ |
| अर्शा प्रवीण ठाकूर | ८४/१/अ | ४-२८-०० | ४=६० |
| | ९०/१ | ३-१९-०० | १=३८ |
| | ९०/३ | १-७२-०० | ०=३४ |
| | ९०/४ | १-४८-०० | ०=३१ |
| | ९०/६ | ०-५६-०० | ०=२५ |
| | ९०/१५ | २-६१-०० | ०=८७ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १४/०७/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (बांधकाम), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, यांचे द्वारे खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदेद्वारे एक पाकीट बोली प्रणालीअंतर्गत खुली निविदा मागविण्यात येत आहे. **कामाचे नाव**: महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागांतर्गत आरवली रोड स्थानक (एव्हीआरडी) येथील उच्चस्तरीय प्लॅटफॉर्म क्र. 1 चा विस्तार. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-एव्हीआरडीपीएफ-2026-16, दि. 14.07.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु.39,76,046.18 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 21.07.2026. **बंद होण्याची तारीख/वेळ**: 04.08.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत, ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्यासाठी. **काम पूर्ण करण्याचा कालावधी**: पावसाळ्यासह 4 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** संकेतस्थळाला भेट द्या तसेच शुद्धिपत्र / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, गाव मौजे शेणवली ता. तळा, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलानी खरेदी घेण्याचे ठरविले असून या मिळकतीत इतर कोणाचा काही एक हक्क हितसंबंध, गहाण, तारण, लिज, पोटगी, निवाडा, भाडेपट्टा अगर अन्य प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत खाली सही करणार यांचेकडे लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकती दाखल कराव्यात, या मुदतीत हरकती न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून या मिळकतीबाबत पुढील व्यवहार केले जातील व त्याप्रसंगी कसलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. करिता जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शेणवली ता. तळा, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-**

| अनु क्र. | मौजे | स.नं./गट नं. | क्षेत्र (हे.आर) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | शेणवली | १६४/१ | ०-८२-०० | श्री. उमाजी गोविंद महाडीक |

सही/-
**ॲड. प्रितेश प्रमोद मेकडे**
बी.एस्सी.एल.एल.बी
रा.तळा ता.तळा जि.रायगड.
मो.नं. ८४४६२८४९४९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मनोहर गिरधर ठाकूर | ८३/२/ब | १-६२-०० | १=१२ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १४/०७/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे मुळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे मालक सागर चंद्रकांत म्हात्रे वगैरे रा. वेश्वी, संतोषी माता मंदिराजवळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांजकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुळे, तालुका अलिबाग येथे भूमापन क्रमांक व उपविभाग ८७ एकूण क्षेत्र २-२५-०० हे. आर. आकार रु.०-०० पै. ही मिळकत**

अलिबाग,
दिनांक : १३.०७.२०२६

सही/-
**(ॲड.श्री.प्रसाद विजय वर्तक)**
**जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड**

**अर्जदाराचे वकील : अधिवक्ता अनघा गणपत गायकवाड**

**जाहीर नोटीस**

कर्जत येथील मा. प्रधान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११५/२०२६ नि.नं. ९/ ड ने. ता. ०६/०८/२०२६ १) सौ. स्वरुपा सुरेश सहस्त्रबुध्दे, वय ६८ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा. ऐ २०१, ऐ विंग, शांती कृपा हौसिंग सोसायटी, १४९९ ए. एकसार गाव, शांती कृपा आश्रम मांडपेश्वर, शांती आश्रम बस डेपो समोर, शांती धाम बिल्डींग जवळ बोरीवली, पिन ४०००१३. २) श्रीमती किर्ती रविंद्र दातार, वय ६५ वर्षे, व्यवसाय गृहिणी, रा. २७/६, चितामणी, सागर सोसायटी, जुना पुणे मुंबई रोड, जोग सेंटर मागे, खडकी, खडकी पुणे सिटी, पुणे ४११००३. ... अर्जदार

**विरुद्ध**

कोणीही नाही
सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की :- ... सामनेवाले

सदरील अर्जदार क्र.१ व अर्जदार क्र.२ या सख्ख्या बहिणी आहेत. अर्जदार क्र.१ व २ चे वडील कै. विश्वनाथ आत्माराम परांजपे हे दिनांक ०३ जुलै २००४ रोजी ठिकाण- प्रयाग डॉस्पिटल, डॉ. एस.डी.प्रयाग, जिल्हा पुणे येथे मृत्यु पावलेले आहेत. आई कै. वसुधा विश्वनाथ परांजपे या दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी ठिकाण -२७/६ चिंतामणी, सागर सोसा., वाकडेवाडी, पुणे मुंबई रोड, पुणे शहर, पुणे महाराष्ट्र ४११ ००३ येथे मयत झालेल्या आहेत. त्यांना सदरील अर्जदार क्र. १ व २ यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. कै. विश्वनाथ आत्माराम परांजपे व कै. वसुधा विश्वनाथ परांजपे यांची मौजे कर्जत तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील कर्जत नगरपरिषद हद्दीत सर्व्हे नंबर २०, हिस्सा नंबर २ (ब) वरील पूर्वा बिल्डींग, फ्लॅट नं. १०२, पहिला मजला, या स्थावर मिळकतीचे त्यांचे मृत्युपश्चात कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला मिळणे आवश्यक आहे.

सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा. न्यायालय पुरावा घेऊन योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. आज दि. ०८/०७/२०२६ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, कर्जत**

(शिक्का)

**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**कनिष्ठ स्तर, कर्जत**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, कु. अतिश कमलाकर जाधव रा.आवळस पोस्ट बीड बुद्रूक तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री हिरामण जनार्दन गायकवाड रा. बीड बुद्रूक तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे मिळकतीचे वर्णन

**मौजे मुगपे तालुका.कर्जत जिल्हा.रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ- मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३७ | ५ | ०-०५-६० <br> पो.ख. ०-००-२० <br> एकुण क्षेत्र ०-०५-८० | ० .३१ |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्नभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेही प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी. मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल साठेकरार/खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दिनांक : १४/०७/२०२६

अशिला तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. अविनाश अंकुश बैलमारे**
ऑफीस पत्ता ३१७ अ, न्यू बेक हाऊस,
बेक हाऊस लेन, काळा घोडा, फोर्ट,
मुंबई ४००००१
मो.नं ९७३०१०९९४७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| कुरुष प्रवीण ठाकुर | ८०/२ | ३-३७-०० | ०=३७ |
| | ८०/३ | २-३०-०० | ०=१९ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १४/०७/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

फॉर्म नं. १४ (विनियमन ३३ (२) पाहा
रजि. एडी/दस्तीद्वारे अन्यथा प्रसिद्धीद्वारे

**वसुली अधिकारी १/२**
**कर्जवसुली न्यायाधिकरण पुणे**
**युनिट क्र. ३०७ ते ३१०, ३ रा मजला, काकडे बिझ आयकॉन बिल्डिंग, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६.**
**मागणी सूचना**
**कर्जवसुली व दिवाळखोरी कायद्याचे अनुच्छेद २५ ते २८ व आयकर कायदा, १९६१ च्या द्वितीय अनुसूचीचे नियम २ अंतर्गत सूचना**

**आरसी/४८०/२०२५,** **दि.१९.०६.२०२६**

**बँक ऑफ इंडिया**
**विरुद्ध**
**श्री सिद्धीविनायक एन्टरप्रायझेस, प्रोप्रा. श्री.हृषिकेश ज्ञानदेव गोळे व अन्य**

प्रति,
**सीडी १ - श्री सिद्धीविनायक एन्टरप्रायझेस, प्रोप्रा. श्री. हृषिकेश ज्ञानदेव गोळे** व अन्य
६, चोगले कॉम्प्लेक्स, मु. पो. बोर्लीपंचतन, तालुका श्रीवर्धन, रायगड, महाराष्ट्र.
तसेच अन्य पत्ता मु. पो. वडवली, तालुका श्रीवर्धन, रायगड, महाराष्ट्र - ४०२४०३.
तसेच अन्य पत्ता : वाकळघर, पोस्ट दंगडुरी, तालुका श्रीवर्धन, रायगड, महाराष्ट्र - ४०२४०४.
**सीडी २ : श्री. विजय सदाशिव जोशी ऊर्फ विजय सदाशिव पटवर्धन**
मु. पो. दिवे आगर, तालुका श्रीवर्धन, रायगड, महाराष्ट्र - ४०२ ४०४.

याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, **पीठासीन अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण , पुणे यांच्याद्वारे ओए/९९४/२०२३ मध्ये मंजूर आदेशाच्या अनुषंगाने जारी वसुली प्रमाणपत्रानुसार रक्कम रु. ५,१६,४७,२८२.०० (रु. पाच कोटी सोळा लाख सत्तेचाळीस हजार दोनशे ब्याऐंशी मात्र)** अधिक त्यावरील **दि. २४.११.२०२२** पासून वसुलीच्या तारखेपर्यंत दरसाल ९% दराने सरळव्याज स्वरूपात पुढील व्याज तसेच मूल्य व खर्च तसेच **रु. १,७५,००५.०० (रु. एक लाख पंचाहत्तर हजार पाच मात्र)** इतकी रक्कम तुमच्या विरोधात (संयुक्त स्वरूपात व विशेष स्वरूपात) थकित झालेली आहे.

२. तुम्हाला याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की तुम्ही सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत सदर रकमेचे प्रदान करावे अन्यथा बँकेच्या थकित कर्जवसुलीनुसार व वित्तीय संस्था कायदा, १९९३ व त्याअंतर्गत संस्थापित नियमांनुसार वसुली करण्यात येईल.

३. तुम्हाला याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की सुनावणीच्या पुढील तारखेपूर्वी तुम्ही प्रतिज्ञापत्राद्वारे तुमच्या संपत्तीचा तपशील घोषित करावा.

४. तुम्हाला याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की तुम्ही अधोहस्ताक्षरितांसमक्ष **दि. २६.१०.२०२६** रोजी स. १०.३० वाजता पुढील प्रक्रियेकरिता उपस्थित राहावे.

५. वरील निर्देशित सदर रकमेबरोबरच तुम्हाला खालील प्रमाणे प्रदान करावे लागेल :
अ) सदर प्रमाणपत्र/प्रक्रिया अंमलबजावणीच्या सूचनेच्या तारखेपश्चात त्वरित सुरू होत असलेल्या कालावधीकरिता देय असे व्याज.
ब) सदर सूचना व वॉरन्ट्स जारी करण्यासाठी तसेच थकित रकमेच्या वसुलीकरिताच्या अन्य प्रक्रिया व अन्य सर्व कारवाई करण्यासाठी आलेले सर्व मूल्य, प्रभार व खर्च रक्कम.

माझी सही व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. १९.०६.२०२६ रोजी जारी.

**(शिक्का)**

सही/-
**विनय सक्सेना**
**वसुली अधिकारी-२,**
**कर्जवसुली न्यायाधिकरण, पुणे**

तुम्हाला निर्देश देण्यात येत आहेत की प्रमाणपत्र ऋणकोद्वारे करण्यात आलेले प्रदान, काही असल्यास, ते प्रमाणपत्र ऋणकोंकडून सदर देय असलेल्या कर्जाच्या एकत्रित खात्यामध्ये वळते करण्यात येईल आणि वसुली अधिकारी हे प्रदान स्थिती नियमित स्वरूपात प्रदर्शित करीत राहतील.
देखभालीत एकत्रित खाते हे वसुली अधिकाऱ्यांच्या पडताळणीच्या अधीन असेल. तुम्हाला पुढे निर्देश देण्यात येत आहेत की तुम्ही
वरील प्रकरणासंदर्भातील एकूण दाव्याचा तारीखवार अहवाल तसेच जेथून कर्जाची वसुली होणार आहे अशा मालमत्तेचा संपूर्ण तपशील सादर करावा.

फॉर्म नं. १६ (विनियमन ३४ (३) पाहा
सर्व अनुज्ञेय माध्यमांतून

**वसुली अधिकारी १/२ यांचे कार्यालय**
**कर्जवसुली न्यायाधिकरण पुणे**
**युनिट क्र. ३०७ ते ३१०, ३ रा मजला, काकडे बिझ आयकॉन बिल्डिंग, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६.**

**टीआरसी/४७/२०१५,** **दि. २५.०६.२०२६**

**आयकर कायदा, १९६१ च्या दुसऱ्या अनुसूचीचा नियम ४८ सहवाचन कर्जवसुली व दिवाळखोरी कायदा, १९९३ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या जप्तीचे वॉरन्ट**

**बँक ऑफ इंडिया**
**विरुद्ध**
**मे. आनंद पोल्ट्री फार्म व अन्य**

प्रति,
**सीडी ७ : श्रीमती मनीषा भालचंद्र म्हात्रे**, मु. कोळगाव, पोस्ट : सासवणे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र - ४०२ २०१.
**सीडी ८ : श्रीमती अलका नथुराम थळी,** मु. कोळगाव, पोस्ट : सासवणे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र - ४०२ २०१.

ज्याअर्थी (सी.डी.) यांनी **रु. १,००,३१,३५५.१७ (अक्षरी रु एक कोटी एकतीस हजार तीनशे पंचावन्न व सतरा पैसे मात्र)** चे प्रदान करण्यात कसूर केली आहे; म्हणजेच प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी संयुक्तपणे व स्वतंत्रपणे, आणि प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी केवळ मृत हमीदार दिवंगत श्री. लक्ष्मण शंकर पाटील यांच्या शिल्लक राहिलेल्या मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत संयुक्तपणे व स्वतंत्रपणे, **१३ ऑगस्ट २००८ रोजीची रु. ९८,५६,३५५.१७ (अक्षरी रु. अठ्ठ्याण्णव लाख छप्पन्न हजार तीनशे पंचावन्न व सतरा पैसे मात्र) ही रक्कम १४ ऑगस्ट २००८** पासून वसुली होईपर्यंत १२% वार्षिक दराने व्याजासह अदा करावी; आणि ज्याअर्थी पीठासीन अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण, ३ मुंबई यांच्याद्वारे तयार करण्यात आलेलेप्रमाणपत्र क्र. टीआरसी/४७/२०१५ अन्वये, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी संयुक्तपणे व स्वतंत्रपणे आणि प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी केवळ मृत हमीदार दिवंगत. **श्री. लक्ष्मण शंकर पाटील यांच्या शिल्लक राहिलेल्या मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत संयुक्तपणे व स्वतंत्रपणे रु. १,७५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र)** इतका खर्च अदा करावा.

व ज्याअर्थी पीठासीन अधिकारी कर्जवसुली न्यायाधिकरण ३ मुंबई यांनी **ओए/८१/२००३ अंतर्गत वसुली प्रमाणपत्र दि. ०१.१०.२००८ जारी करून प्रमाणपत्र धारक बंकेला रु. १,००,३१,३५५.१७ (अक्षरी रु. एक कोटी एकतीस हजार तीनशे पंचावन्न आणि सतरा पैसे मात्र)** ही रक्कम अदा करण्याचा आदेश दिला होता; म्हणजेच प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी संयुक्तपणे व स्वतंत्रपणे, आणि प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी केवळ मृत हमीदार दिवंगत. श्री.लक्ष्मण शंकर पाटील यांच्या शिल्लक राहिलेल्या मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत संयुक्तपणे व स्वतंत्रपणे **रु. ९८,५६,३५५.१७ ही रक्कम अदा करावी. १३ ऑगस्ट २००८ रोजीची रक्कम रु. ९८,५६,३५५.१७ (अक्षरी: रुपये अठ्ठ्याण्णव लाख छप्पन्न हजार तीनशे पंचावन्न आणि सतरा पैसे मात्र) ही रक्कम, तसेच १४ ऑगस्ट २००८ पासून प्रत्यक्ष वसुली होईपर्यंत १२% वार्षिक दराने होणारे व्याज; आणि प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांनी (संयुक्तपणे व स्वतंत्रपणे)** आणि प्रतिवादी क्रमांक ५ ते ८ यांनी (केवळ मृत हमीदार दिवंगत श्री. लक्ष्मण शंकर पाटील यांच्या उर्वरित मालमत्तेच्या मर्यादेपर्यंत, संयुक्तपणे व स्वतंत्रपणे) रु. १,७५,०००/- (अक्षरी: रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) इतका खर्च (जो तुमच्याकडून संयुक्तपणे व स्वतंत्रपणे देय आहे) अदा करावी व ज्याअर्थी सदर रक्कम प्रदानित करण्यात आलेली नाही.

२. याद्वारे आदेश देण्यात येत आहे की तुम्ही प्रमाणपत्र ऋणको यांना
अधोहस्ताक्षरितांकडून पुढील आदेश मिळेपर्यंत खालील निर्देसित मालमत्तेचे कोणत्याही स्वरूपात हस्तांतरण वा प्रभार निर्मित करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे तसेच सर्व व्यक्तींना व त्यांना यापुढे असे हस्तांतरण करून कोणतेही लाभ घेण्यास मनाई करण्यात येत आहे.

३. तुम्ही **वसुली अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण पुणे यांच्या समक्ष दि. ३०.०७.२०२६ रोजी स. १०.३० वाजता** उपस्थित विक्रीच्या उद्घोषणेच्या अटी निश्चित करण्यासाठी दिनांक निश्चितीसाठी उपस्थित राहावे.

**मालमत्तेचे विवरण**
**मालमत्तेचा तपशील**

मालमत्ता प्रकार : मालमत्तेचा तपशील
स्थावर मालमत्ता : गट क्र. ४४ - ए व गट क्र. ४४ - बी, मु. गाव सासवणे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड.
माझी सही व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. २५.०६.२०२६ रोजी जारी.

**शिक्का**

सही/-
**(रविकांत विनायक यादव)**
**वसुली अधिकारी - १**
**कर्जवसुली न्यायाधिकरण, पुणे**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे गौरकामत तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| | ८०/१ | १-६६-०० | ०=४४ |
| समीर काशीनाथ देशमुख | ८०/५/ब | २-७१-०० | ०=८२ |
| विद्या काशीनाथ देशमुख | ८०/६ | १-५४-०० | ०=५६ |
| शिल्पा संतोष सूर्याराव | ८०/८ | ०-८६-०० | ०=३७ |
| | ८०/९ | २-८३-०० | ०=६० |
| | ८०/१० | १-१७-०० | ०=०३ |
| | ८२/१ | ०-३४-०० | ०=२२ |
| | ९०/५ | ०-४०-४० | ०=२५ |
| | ९१ | ०-२६-०० | ०=३४ |
| | ९३/१ | ०-६१-०० | ०=१६ |
| | ९३/२ | ०-४९-०० | ०=१२ |
| | ९३/३ | ०-६३-०० | ०=०९ |
| | ९३/४ | ०-४३-०० | ०=०३ |
| | ९३/६ | १-२९-०० | ०=५३ |
| | ९३/७ | १-३७-०० | ०=७८ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

ठिकाण:- कर्जत
दिनांक :- १४/०७/२०२६
मो. नं. ९९२१०२३८९४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता: श्री गणेश प्रसाद सोसा. प्लॅट नं. १०४.
कदम वाड्या जवळ, स्टेशन रोड. कर्जत
ता. कर्जत जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे - किंजळोलीखुर्द, ता. महाड जि.रायगड, येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही श्री. इरशाद बशीर नावडेकर यांच्या मालकीच्या व ताबेकब्जातील मिळकत आमचे आशिल श्री. शफी उस्मान खान व इतर कायम खरेदी घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - किंजळोलीखुर्द, ता. महाड जि. रायगड,**

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|
| ९८/५ | ०-४१-० <br> पो.ख ०-१४-० <br> एकूण ०-५५-० | ०.२५ |

सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा तथाकथीत संबंध असल्यास संबंधितांनी आपआपल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसाच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमुद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहित व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे आशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत. व संबंधितांनी आपआपल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

पनवेल
दिनांक :१४/०७/२०२६

सही/-
**ॲड. परवेज इरहाक खान**
९ व १०, तिर्थराज कॉ. ऑप. हौ. सोसायटी
प्लॉट नं. २० तालुका पोलिस स्टेशन मार्ग,
जुना ठाणा नाका रोड, ता. पनवेल, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. नरेंद्र पांडुरंग मोडक रा. १८०१ क्षितिज बिल्डिंग, प्लॉट नंबर १३२, सेक्टर ४, चारकोप कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०००६४ यांच्याकडुन खरेदी घेण्याबाबत व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| रेवदंडा, ता. अलिबाग | ६६/२ | क्षेत्र (चौ.मी.) ३.२९.०० | १३५९ | ३४५.९० |
| | ६६/१/१ | क्षेत्र (चौ.मी.) ०.००.८० | | |

ही मिळकत या नोटीसचा विषय आहे. रेवदंडा येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ६६/२ आणि ६६/१/१ तसेच या मिळकतीवरील दोन मालमत्ता क्र. ५९५ व ५९६ यांचे ग्रामपंचायत रेवदंडा यांचेकडून प्राप्त झालेले असेसमेंट उतारे या संपूर्ण मिळकतीचे सिटी सर्व्हे उताऱ्यात रूपांतर होऊन सिटी सर्व्हे नंबर १३५९ हे मालमत्ता पत्रक (प्रॉपर्टी कार्ड) प्राप्त झालेले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क (जाण्या येण्याचा मार्ग) या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

उक्त मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहील्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांना कळावे.

अलिबाग
दिनांक : १४/७/२०२६

सही /-
**ॲड. पराग मधुकर गुरव**
ता. अलिबाग जि. रायगड
मोबा. ९३२६१३१४८०/८४४६८८०००९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, अफरोजा फैयाज दळवी, यांनी त्यांचे खुद्द मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची, मौजे अबीटघर, ता.मुरूड, जि.रायगड येथील गट नं.०६, एकूण क्षेत्र २.३५.०० हे.आर.(आकार रू.पै.१.१९) पैकी क्षेत्र २.३५.०० हे.आर.ही मिळकत योग्य त्या खरेदीदारास विकण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या सातबारा उतारी मालक कब्जेदार म्हणून अफरोजा फैयाज दळवी यांची नावे दाखल आहेत. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत अफरोजा फैयाज दळवी, यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, सदर मिळकती या निर्वेध आहेत असे समजून सदर विद्यमान मालक योग्य त्या खरेदीदारासोबत विक्री व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती विद्यमान मालक व त्यांचे खरेदीदारावर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग
तारीख : १४/०७/२०२६

सही/-
**ॲड.अमित विष्णु राऊळ**
रा.सातिर्जे, पो.मापगांव
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा नं. ८६९८०००२३८/७३७८७८९१३२


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### पुणे जॅग्वार्सचा यूपी प्रोमेशियन्सवर विजय

**पुणे :** अल्टिमेट टेबल टेनिस सीझन ७ मधील रविवारी डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या सामन्यात, फ्रेंच ऑलिंपियन आणि स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या पृथिका पावाडे हिने दमदार कामगिरी केली. तिच्या या कामगिरीच्या जोरावर पीबीजी पुणे जॅग्वार्सने यूपी प्रोमिथियन्सचा ९-६ असा पराभव करत स्पर्धेतील आपला पहिला विजय नोंदवला.महिला एकेरीच्या निर्णायक सामन्यात, पृथिकाने बटरफ्लाय मध्ये दोनदा सर्वात मौल्यवान खेळाडू ठरलेल्या यांगझी लियूचा पराभव करून आपल्या या कामगिरीला अविस्मरणीय वळण दिले. सुरुवातीला एक गेम गमावल्यानंतर तिने जबरदस्त पुनरागमन केले आणि निर्णायक गेममध्ये उत्कृष्ट खेळ करत या हंगामातील आतापर्यंतच्या सर्वात प्रभावी विजयांपैकी एक विजय साकारला. जर्मनीच्या रिकार्डो वाल्थरने प्रभावी कामगिरी करत इजिप्तच्या ओमर अस्सारचा तीन गेम्समध्ये पराभव करून यूपी संघाला दमदार सुरुवात करून दिली. पुण्याने याला त्वरित प्रत्युत्तर दिले; दिया चितळेने एक गेम गमावल्यानंतर जोरदार पुनरागमन केले.

### यजमान देश स्पर्धेबाहेर; तिकीट दरात घसरण

**मियामी :** फुटबॉल विश्वचषक स्पर्धेतून यजमान अमेरिका



आणि मेक्सिकोचे आव्हान संपुष्टात आल्यानंतर उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांच्या तिकिटांच्या पुनर्विक्रीच्या दरांमध्ये मोठी घसरण झाली आहे. फिफाने अंतिम सामन्यासाठी सुमारे १,२०० आसनांची तिकिटे प्रति तिकीट ७,३८० डॉलर दराने विक्रीसाठी खुली केली आहेत. कॅलिफोर्नियातील एंगलवूड येथे शुक्रवारी झालेल्या स्पेन आणि बेल्जियम सामन्याच्या तिकिटाची सर्वात कमी किंमत १,३८१ डॉलरवर आली होती. अमेरिका संघ अंतिम १६ च्या फेरीत बेल्जियमकडून पराभूत होण्यापूर्वी याच तिकिटाचा दर ३,२६१ डॉलर इतका उच्चांकी होता. मियामी गार्डन्स येथे शनिवारी झालेल्या इंग्लंड आणि नॉर्वे सामन्याच्या तिकिटाचा किमान दर २,०४९ डॉलरवर घसरला, जो इंग्लंडने मेक्सिकोचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करण्यापूर्वी ३,८६६ डॉलर होता. तसेच मिझोरीतील कन्सास सिटी येथे झालेल्या अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड सामन्याच्या तिकिटाचा किमान दर २,३८१ डॉलरवरून थेट १,१४२ डॉलरवर आला आहे. यजमान संघ स्पर्धेतून बाहेर पडल्याने तिकिटांची मागणी घटली आहे.

### ब्रेंडन मॅक्युलम यांची हकालपट्टी

**इंग्लंड :** इंग्लंडने भारताविरुद्धची पाच सामन्यांची टी-२० मालिका ४-० अशी जिंकली. यानंतर लगेचच इंग्लंडमधून एक



धक्कादायक बातमी समोर आली आहे. इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्डाने प्रशिक्षक ब्रेंडन मॅक्युलम यांना घरचा रस्ता दाखवला आहे. मात्र, येथे ही गोष्ट महत्त्वाची आहे की, ब्रेंडन मॅक्युलम आता केवळ इंग्लंडच्या कसोटी संघाचे प्रशिक्षक राहणार नाहीत. पांढऱ्या चेंडूच्या फॉरमॅटमध्ये म्हणजेच एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये ब्रेंडन मॅक्युलम हेच इंग्लंडचे मुख्य प्रशिक्षक राहतील. न्यूझीलंडचे माजी दिग्गज खेळाडू ब्रेंडन मॅक्युलम यांना सुमारे चार वर्षांपूर्वी इंग्लंडने कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक बनवले होते. इंग्लंड क्रिकेटने सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, ब्रेंडन मॅक्युलम इंग्लंड पुरुषांच्या कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदावरून पायउतार होतील, परंतु ते इंग्लंड पुरुषांच्या व्हाईट-बॉल (मर्यादित षटकांच्या) संघांचे नेतृत्व करत राहतील. याचा अर्थ आता ब्रेंडन मॅक्युलम हे केवळ एकदिवसीय आणि टी-२० संघाचे मुख्य प्रशिक्षक असतील. ईसीबीचा हा निर्णय इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून संन्यास (निवृत्ती) घेतल्यानतंर समोर आला आहे. कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून कार्यकाळ संपल्यामुळे आपल्याला निराशा झाल्याचे मॅक्युलम यांनी मान्य केले आहे. त्यांच्या वक्तव्यावरून असेही संकेत मिळाले आहेत की, हा निर्णय त्यांनी स्वतःहून पद सोडण्याऐवजी बोर्डाने घेतलेल्या निर्णयाचा परिणाम आहे.

## क्रिकेटच्या पंढरीत कसोटी विजयाचा गजर

# ‘लॉर्ड्स’वर भारतीय महिला ‘बॉस’

| लॉर्ड्स | वृत्तसंस्था |

१४२ वर्षांत पहिल्यांदाच क्रिकेटची पंढरी म्हटल्या जाणाऱ्या लॉर्ड्सच्या मैदानावर खेळण्यात आलेल्या कसोटी सामन्यात भारताच्या महिला संघाने दणदणीत विजय नोंदवला. भारत आणि इंग्लंड महिला संघांमधील या एकमेव कसोटी सामन्यात टीम इंडियाच्या लेकींनी पहिल्या डावापासूनच आपली पकड मजबूत ठेवली. अखेरीस कसोटीच्या चौथ्या दिवशी भारतीय संघाने २७० धावांनी दमदार विजय मिळवला. यासह लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर कसोटी सामना जिंकणारा जगातील भारत हा पहिला महिला संघ ठरला.

यास्तिका भाटिया, क्रांती गौड व स्मृती मानधना भारताच्या या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. याशिवाय भारताच्या प्रत्येक खेळाडूने आपली जबाबदारी चोख बजावत भारताच्या या ऐतिहासिक कसोटी विजयात मोलाची भूमिका बजावली. भारताच्या गोलंदाजांचं या विजयात मोठं योगदान आहे. भारताचा हा ऐतिहासिक विजय पाहण्यासाठी आणि संघाचं खास




कौतुक करण्यासाठी लॉर्ड्स स्टेडियममध्ये सचिन तेंडुलकर, आयसीसी चेअरमन जय शाह व बीसीसीआयचे देवजीत सैकिया ही मंडळी उपस्थित होती.

नताली सायव्हर ब्रंटच्या नेतृत्त्वाखालील इंग्लंड महिला संघाने नाणेफेक जिंकत गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या भारतीय संघाने पहिल्या डावात २८५ धावा केल्या आणि इंग्लंडचा संघ प्रत्युत्तरात १७० धावांवर सर्वबाद झाला. यासह टीम इंडियाला ११५ धावांची आघाडी मिळाली, तर दुसऱ्या डावात यस्तिका भाटियाच्या विक्रमी शतकी खेळीच्या बळावर टीम इंडियाने ३४१ धावा करत डाव घोषित केला आणि इंग्लंडला विजयासाठी ४५७ धावांचं मोठं आव्हान दिलं. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ १८६ धावा करत सर्वबाद झाला.

भारताने विजयासाठी दिलेल्या ४५७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचे टॉप-५ फलंदाज स्वस्तात माघारी परतले. क्रांती गौड, सायली सातघरे व स्नेह राणा यांनी इंग्लंडला धाव करण्याची संधी दिली नाही. यष्टीरक्षक ॲमी जोन्स व गोलंदाज सोफी एक्सलस्टन यांनी अर्धशतकी खेळी केल्या. तर मॅडी विलियर्सने २६ धावांचं योगदान दिलं. तर भारताकडून स्नेह राणाने दुसऱ्या डावात ४ विकेट्स घेतल्या. तर सायली सातघरे, क्रांती गौड व दीप्ती शर्मा यांनी २-२ विकेट्स घेतल्या.

भारताने पहिल्या डावात २८५ धावा केल्या; यात स्मृती मानधना हिच्या ८३ धावांच्या शानदार खेळीचा विशेष वाटा होता. कर्णधार हरमनप्रीत कौरने ५८ धावा केल्या, तर दीप्ती शर्माने ५७ धावांचं योगदान दिलं. याला प्रत्युत्तर म्हणून इंग्लंडचा पहिला डाव अवघ्या १७० धावांत आटोपला. क्रांती गौडने ३७ धावांत ५ विकेट्स घेत निर्णायक भूमिका बजावली, तर सायली सतघरे आणि स्नेह राणा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

पहिल्या डावात ११५ धावांची आघाडी घेतल्यानंतर, भारतीय संघाने दुसऱ्या डावात मोठी धावसंख्या उभारली. यस्तिका भाटियाने १५८ चेंडूंत ११३ धावांची शतकी खेळी केली, तर स्मृती मानधनाने पुन्हा एकदा ७० धावांचं योगदान दिलं. त्यानंतर रिचा घोषने ५२ चेंडूंत ५० धावांची आक्रमक खेळी केली. परिणामी, भारताने आपला दुसरा डाव ७ बाद ३४१ धावांवर घोषित केला आणि इंग्लंडसमोर विजयासाठी ४५७ धावांचे कठीण आव्हान उभं केलं.

## यानिक सिन्नरच पुन्हा नंबर ‘वन’, सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या यानिक सिनरने विम्बल्डन २०२६ च्या पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले. सेंटर कोर्टवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात त्याने जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हचा ६-७(७), ७-६(२), ६-३, ६-४ असा पराभव करून आपले सलग दुसरे विम्बल्डन विजेतेपद पटकावले. हे सिनरच्या कारकिर्दीतील सलग दुसरे आणि ऑल इंग्लंड क्लबमधील पाचवे ग्रँड स्लॅम विजेतेपद ठरले. या विजयामुळे त्याने झ्वेरेव्हवरील आपले वर्चस्व कायम राखले आणि त्याच्यावर सलग १० वा विजय नोंदवला. सामन्याची सुरुवात फारशी रोमांचक झाली नाही,



कारण झ्वेरेव्हने टाय-ब्रेकमध्ये पहिला सेट गमावल्याने सिनरची १४-सेटची विजयी मालिका खंडित झाली.

पहिला सेट अटीतटीचा झाला आणि टाय-ब्रेकमध्ये झ्वेरेव्हने विजय मिळवला. दुसऱ्या सेटपासून सिनरने सामन्यावर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली. त्याने टाय-ब्रेक जिंकून सामना बरोबरीत आणला आणि त्यानंतर पुढचे दोन सेट जिंकून विजेतेपद पटकावले.

## फुटबॉलर जेडन ॲडम्सचा मृत्यू

| मुंबई | प्रतिनिधी |

दक्षिण आफ्रिकन फुटबॉलपटू जेडन ॲडम्सचे वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी निधन झाले आहे. ॲडम्सने नुकतेच फिफा विश्वचषकात बाफाना बाफाना संघाकडून खेळण्याचे आपले स्वप्न पूर्ण केले होते. त्याच्या निधनाने चाहते, संघसहकारी आणि क्लबला मोठा धक्का बसला आहे. त्याच्या मृत्यूचे कारण अद्याप उघड झालेले नाही. जेडन ॲडम्सने क्लब फुटबॉलमध्ये मॅमेलोडी सनडाउन्ससाठी अपवादात्मक कामगिरी केली होती. संघाच्या सीएएफ चॅम्पियन्स लीग विजयात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली, ज्यामुळे त्याला दक्षिण आफ्रिकेच्या विश्वचषक संघात स्थान मिळाले. त्याने विश्वचषकातही संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## वनडे मालिकेपूर्वी बीसीसीआयने संघच बदलला

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची टी-२० मालिका संपल्यानंतर, दोन्ही देशांमध्ये तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका होणार आहे. यातील पहिला सामना १४ जुलै रोजी बर्मिंगहॅम येथे खेळला जाणार आहे. बीसीसीआयने १२ जुलै रोजी संघात दोन बदल केले.

चौथ्या टी-२० सामन्यापूर्वी दुखापतग्रस्त झालेल्या हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्ती यांच्या जागी प्रिन्स यादव आणि रवी बिश्नोई यांना संघात स्थान देण्यात आले आहे. बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार, तिसऱ्या टी-२० सामन्यानंतर हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्ती यांना अस्वस्थ वाटू लागले होते.

स्कॅन आणि वैद्यकीय चाचण्यांमधून असे दिसून आले की, हर्षितला ग्रेड १ हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली आहे, तर वरुणला ग्रेड २ हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून, दोन्ही खेळाडूंना चौथ्या टी-२० सामन्यासाठी विश्रांती देण्यात आली आणि त्यांना संपूर्ण मालिकेतून वगळण्यात आले. हर्षितची या मालिकेसाठी निवड न झाल्याने, वरुणला झिम्बाब्वे दौऱ्यातूनही वगळण्यात आले आहे.

रवी बिश्नोईने वरुण चक्रवर्तीची जागा घेतली आहे. तो इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या आणि दुसऱ्या टी-२० सामन्यात खेळला होता. चेस्टर-ले-स्ट्रीट येथे पावसामुळे त्याने गोलंदाजी केली नाही.

दुसऱ्या सामन्यात त्याने चार षटकांत ६० धावा दिल्या आणि त्यानंतर त्याला संघातून वगळण्यात आले. त्याचे नो-बॉल आणि एका षटकात २७ धावा देणे हे देखील भारताच्या पराभवाला कारणीभूत ठरले.

### वनडे मालिकेसाठी टीम इंडिया

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (विकेटकीपर), इशान किशन (विकेटकीपर), वॉशिंगटन सुंदर, अक्षर पटेल, शिवम दुबे, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंह, गुरनूर ब्रार, प्रिन्स यादव

### टी २० मालिकेसाठी टीम इंडिया

श्रेयस अय्यर (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा (उप-कर्णधार), ईशान किशन (विकेटकीपर), शिवम दुबे, सूर्यांश शेडगे, रिंकू सिंह, हर्ष दुबे, प्रिन्स यादव, यश ठाकुर, अशोक शर्मा, मयंक यादव, प्रभसिमरन सिंह (विकेटकीपर), रवि बिश्नोई.

## वनडेसाठी भारताची खास तयारी

| मुंबई | प्रतिनिधी |

भारत आणि इंग्लंड यांच्यात टी-२० मालिका भारतीय संघाने ४-० ने गमावली. यानंतर अनेकांनी अनेक टीका केल्या. आता भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध वनडे मालिका खेळणार आहे. यासाठी खेळाडूंनी सरावही सुरु केला आहे. भारतीय संघ आता इंग्लंडविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. विराट कोहली, रोहित शर्मा, शुभमन गिल आणि जसप्रीत बुमराह सराव करताना पाहायला मिळाले. आता एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. ज्यात विराट कोहली आणि शुभमन गिल दिसले.

## न्यूझीलंडविरुद्ध वेस्ट इंडिजचा ७ विकेट्सने विजय

**विटैल लॉयसने घेतल्या ३ विकेट्स; होप-कार्टीची १३१ धावांची भागीदारी**

| गयाना | वृत्तसंस्था |

वेस्ट इंडीजने न्यूझीलंडला पहिल्या एकदिवसीय सामन्यात ७ गडी राखून हरवून ३ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. या सामन्यात २६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडीजने ४८.५ षटकांत ३ गडी गमावून सामना जिंकला.

कीसी कार्टीने ९५ धावा केल्या, तर कर्णधार शाई होप ५४ धावांवर नाबाद राहिला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १३१ धावांची सामना जिंकवणारी भागीदारी केली. विजयाचा नायक १९ वर्षीय पदार्पण करणारा डावखुरा फिरकी गोलंदाज विटैल लॉयस ठरला, ज्याने आपल्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय सामन्यात ३ बळी घेतले.

न्यूझीलंडचा संघ ४४व्या षटकात ४ गडी गमावून २३४ धावा करून मोठ्या धावसंख्येकडे वाटचाल करत होता, परंतु विटैल लॉयस आणि अल्झारी जोसेफने शेवटच्या षटकांमध्ये सामना फिरवला. न्यूझीलंडने आपले शेवटचे ६ गडी अवघ्या ३३ धावांत गमावले. लॉयसने हेन्री निकोल्स (३७), मार्क चॅपमन आणि मायकेल ब्रेसवेल यांना बाद केले, तर अल्झारी जोसेफने ४१ धावा देऊन ४ बळी घेतले.वेस्ट इंडिजच्या डावातील ३४व्या षटकात कीसी कार्टी ६४ धावांवर फलंदाजी करत होता. जॅकब डफीच्या चेंडूवर षटकार मारल्यानंतर त्याची बॅट मागे जाऊन स्टंप्सला लागली आणि बेल्स पडल्या. न्यूझीलंडने हिट-विकेटची अपील केली, पण तिसरे पंच अहसान रजा यांनी रिप्ले पाहिल्यानंतर त्याला नॉट आउट दिले.

एमसीसीच्या नियम ३५.२ नुसार, जर फलंदाजाने शॉट खेळण्याची प्रक्रिया पूर्ण केली असेल आणि त्यानंतर बॅट, शरीर किंवा कपडे विकेटला लागले, तर त्याला हिट-विकेट आउट मानले जात नाही. याच नियमामुळे कार्टीला जीवदान मिळाले. सुरुवातीचे विकेट लवकर पडल्यानंतर कीसी कार्टी आणि अकीम ऑगस्टे (२८) यांनी डाव सांभाळला.

## तिरंदाजी विश्वचषक स्पर्धा

# भारताच्या प्रीथिका प्रदीपला कांस्यपदक



| माद्रिद | वृत्तसंस्था |

भारताची १७ वर्षीय तिरंदाज प्रीथिका प्रदीप हिने चमकदार कामगिरी करत शनिवारी माद्रिदमध्ये सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक टप्पा ४ स्पर्धेत वैयक्तिक कांस्यपदक पटकावले. या यशासह तिने या स्पर्धेत दुहेरी पदक मिळवण्याचा पराक्रम पूर्ण केला.

प्रीथिकाने जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या तुर्कीच्या हझल बुरूनचा १४५-१४२ अशा फरकाने पराभव केला. पहिल्या फेरीत पिछाडीवर पडल्यानंतरही प्रीथिकाने अप्रतिम पुनरागमन केले आणि शेवटच्या वेधवर अचूक १० गुण मिळवून आपल्या पहिल्या वैयक्तिक विश्वचषक पदकावर नाव कोरले. माद्रिद विश्वचषकापूर्वीच भारतीय संघात रूजू झालेले अमेरिकेचे प्रशिक्षक डेव्ह कझिन्स यांच्या मार्गदर्शनाखाली भारताची ही एक प्रभावी सुरुवात ठरली आहे.

## स्वित्झर्लंडचा धुव्वा उडवत अर्जेंटिना सेमीफायनलमध्ये

| अमेरिका | वृत्तसंस्था |

फिफा वर्ल्डकप २०२६ मध्ये अर्जेंटिनाने स्वित्झर्लंडचा ३-१ अशा फरकाने पराभव करत सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. कॅन्सस सिटी स्टेडियमवर झालेला हा सामना अत्यंत थरारक ठरला. या विजयासह अर्जेंटिनाने सहाव्यांदा वर्ल्डकपच्या सेमीफायनलमध्ये प्रवेश केला आहे.

पहिल्या हाफमध्ये अर्जेंटिनाचे वर्चस्वसामन्याच्या सुरुवातीला अर्जेंटिनाने आक्रमक खेळ केला. १० व्या मिनिटाला मेस्सीने घेतलेल्या कॉर्नर किकवर अलेक्सिस मॅक एलिस्टरने हवेत उंच उडी मारत हेडरने गोल केला आणि अर्जेंटिनाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या गोलनंतर स्वित्झर्लंडचा संघ काहीसा मागे पडला. त्यानंतर स्वित्झर्लंडने जोरदार पुनरागमन केले. ६७ व्या मिनिटाला रिकार्डो रॉड्रिग्जच्या पासवर डॅन नडोए याने गोल करत सामना १-१ अशा बरोबरीत आणला. मात्र, ७२ व्या मिनिटाला स्वित्झर्लंडला मोठा धक्का बसला. त्यांचा स्टार खेळाडू ब्रील एम्बोलो याला दुसरे यलो कार्ड दाखवण्यात आले, जे नियमानुसार रेड कार्डमध्ये बदलले गेले.

सामना १-१ अशा बरोबरीत सुटल्याने मॅच एक्स्ट्रा टाईममध्ये गेली. एक्स्ट्रा टाईमच्या दुसऱ्या हाफमध्ये बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या ज्यूलियन अल्वारेझने जोश लोपेझच्या पासवर गोल करत अर्जेंटिनाला २-१ अशी महत्त्वाची आघाडी मिळवून दिली.

**अर्जेंटिना - इंग्लंडचे ४० वर्ष जुने वैर | एम्बाप्पेचा फ्रान्स यमालच्या स्पेनशी भिडणार**



फिफा फुटबॉल वर्ल्डकप

# उपांत्य फेरीत माजी विजेते

| अटलांटा | वृत्तसंस्था |

फुटबॉल वर्ल्ड कप २०२६ चे उपांत्य फेरीचे सामने निश्चित झाले आहेत. फुटबॉलमधील चार दिग्गज संघ अर्जेंटिना, इंग्लंड, फ्रान्स आणि स्पेनने टॉप-४ मध्ये प्रवेश केला आहे. १९९० नंतर ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा वर्ल्ड कपच्या उपांत्य फेरीत केवळ माजी विजेते संघ पोहोचले आहेत.

या प्रकरणी एक खास गोष्ट अशी आहे की, हे चारही संघ फिफा क्रमवारीत टॉप-४ मध्ये समाविष्ट आहेत. असे पहिल्यांदाच घडले आहे, जेव्हा क्रमवारीतले टॉप-४ संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत आणि विजेतेपदापासून फक्त दोन विजयांच्या अंतरावर आहेत. मंगळवारी किलियन एम्बाप्पेचा फ्रान्स आणि लामिन यमालचा स्पेन आमनेसामने असतील, तर बुधवारी लिओनेल मेस्सीचा अर्जेंटिना आणि हॅरी केनच्या इंग्लंड यांच्यात सामना खेळला जाईल.

अर्जेंटिना आणि इंग्लंडची लढत फक्त फुटबॉलपुरती मर्यादित राहिलेली नाही. १९८२ च्या फॉकलंड युद्धापासून ते वर्ल्ड कपमधील अनेक वादग्रस्त सामन्यांपर्यंत दोन्ही देशांमधील स्पर्धा खूप जुनी आहे.१९८६ च्या वर्ल्ड कपमध्ये डिएगो मॅराडोनाच्या गाजलेल्या हँड ऑफ गॉड गोलमुळे अर्जेंटिनाने इंग्लंडला हरवले होते. १९९८ मध्ये डेव्हिड बेकहमला रेड कार्ड मिळाले आणि अर्जेंटिनाने पेनल्टी शूटआउटमध्ये विजय मिळवला. २००२ मध्ये बेकहमने पेनल्टी गोल करून इंग्लंडला विजय मिळवून दिला होता.

दुसऱ्या उपांत्य फेरीत फ्रान्स आणि स्पेन यांच्यात लढत होईल. दोन्ही संघ २ वर्षांपूर्वी युरोपियन चॅम्पियनशिपच्या उपांत्य फेरीतही भिडले होते. त्यात स्पेनने २-१ ने विजय मिळवला होता.

फ्रान्सकडे किलियन एम्बाप्पे, मायकेल ओलिसे आणि डिजिरे डुए यांसारखे स्टार खेळाडू आहेत. तर स्पेनच्या आशा युवा स्टार लामिन यामाल व मिडफिल्डर मिकेल मेरिनो यांच्यावर अवलंबून असतील. मेरिनोने सलग दोन नॉकआउट सामन्यांमध्ये निर्णायक गोल करून स्पेनला विजय मिळवून दिला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)